# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹


## आज होणार गौरी गणपतींचे विसर्जन

**अलिबाग :** सात दिवसांच्या बाप्पाला, गौराईसह मंगळवारी (दि.२) जड अंतःकरणातून भावपूर्ण निरोप देण्यात येणार आहे. सात दिवस बाप्पासह गौराईची मनोभावे पुजा, आरती करण्यात आली. मंगलमय व आनंदमय वातावरणात मनोभावे सेवा करण्यात आली. यंदा रायगड जिल्ह्यातील समुद्र, तलाव, नदींसह कृत्रिम तलाव अशा एकूण ५०० पेक्षा अधिक ठिकाणी ७२ हजार ६४३ गौरी-गणपतीचे विसर्जन करण्यात येणार आहे. यादरम्यान मिरवणूक व विसर्जन सोहळा आनंदमय वातावरणात साजरा व्हावा, यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. यावेळी कोणताही गैरप्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था बिघडू नये •➤ पान ३ वर


हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री
गौरी गणपती सणानिमित्त स्पेशल ऑफर
२०% सुट
* संयोजक:-भाऊराया हॅन्डलुम,सोलापूर.*
स्थळ- सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल, पोस्ट ऑफिस समोर, अलिबाग
२१ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर पर्यंत वेळ-सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत



✓सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नांव
कमळ
रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२
नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग
(ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील पतसंस्था)
मुख्य कार्यालय :- कमळ भवन, शिवाजी चौक,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड ४०२२०१.दूरध्वनी क्र.:०२१४१-२२६७१६/२२७८६६
₹ 855 कोटींचा व्यवसाय पूर्ण
ठेवी ₹ ४८३ कोटी ४९लाख
गुंतवणूक ₹ १४० कोटी ५० लाख
कर्जे ₹ ३७१ कोटी ६६ लाख
आता लक्ष्य ₹ 1000 कोटी
गणपती बाप्पा मोरया
गणेशोत्सवाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
कमळ परिवार
श्री गणेशाय नमः


## वे|ध|क

### प्रवासी जेट्टी प्रकल्पाला हिरवा झेंडा

**मुंबई :** मुंबईत येणाऱ्या पर्यटकांसाठी आणि मुंबईची आर्थिक उलाढाल अधिक गतीमान करण्यासाठी गेटवे ऑफ इंडिया शेजारी उभारण्यात येणाऱ्या प्रवासी जेट्टी प्रकल्पाविरोधातील सर्व याचिका सोमवारी (दि.१) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे, या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. भारताचे मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती के.विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते व महाराष्ट्र सागरी मंडळ या दोन्ही बाजूंची सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर निर्णय सुनावला.

### ओबीसी आरक्षण बचावासाठी उपोषण

**अंबड :** अंतरवाली सराटी येथे ओबीसी आरक्षण बचावासाठी सोमवारी (दि.१) बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले. यावेळी मराठा समाजाला ओबीसीमधुन आरक्षण देण्यात येऊ नये. ज्या कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नये. निवृत्त न्यायमुर्ती संदीप शिंदे समीतीला मुदत वाढ देण्यात येऊ नये. तसेच, हैदराबाद, सातारा, संस्थानचे गॅझेटियर लागु करू नये आदी मागण्यांसाठी हे उपोषण करण्यात आले आहे. विठ्ठल तळेकर, बाळासाहेब दखणे, बाबासाहेब बटुळे व श्रीहरी निर्मळ यांनी हे उपोषण सुरु केले.

### दुहेरी हत्यांकाडाचा उलगडा

**जयगड :** प्रेयसीचा खून करणाऱ्या खंडाळा येथील दुर्वास पाटील याने वर्षभरापूर्वी आणखी एका तरूणाचा खून केल्याचे उघडकीस आले आहे. पहिला खून पचला असे वाटतं असताना दुर्वास पाटील याने आपल्या प्रेयसीचा खून केला. मात्र, पोलीस तपासात पहिला खून उघडकीस आला. खूनामध्ये सहभागी असलेल्या आणखी दोन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.

# रस्ते दुरुस्तीचा दावा फेल



**50 किमीचे रस्ते निधी अभावी नादुरुस्त**

**25 लाखाच्या निधीची गरज**

रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. साकव जीर्ण झाले आहेत. वेळेवर दुरुस्ती न केल्याने या गणेशोत्सवात नागरिकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. त्यांना खड्डे चुकवत गावातून वाट काढावी लागत आहे. असे असतानाही ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्तीसाठी सुमारे २५ लाख रुपयांची गरज असल्याची माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून मिळाली आहे.

प्रमोद जाधव

। रायगड ।

**जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणारे रस्ते गणेशोत्सवापूर्वी दुरुस्त झाल्याचा दावा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केला. परंतु, हा दावा फोल ठरल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणारे अलिबागसह अन्य तालुक्यातील ५० किलो मीटरचे अंतर्गत रस्ते निधी अभावी नादुरुस्त असल्याची माहिती समोर येत आहे.**



रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार इतकी आहे. जिल्ह्यात ८०९ ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीच्या हद्दीत १ हजार ८०० हून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. त्यातील जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित ५ हजार किलो मीटरचे रस्ते आहेत. या रस्त्यांचे नुतनीकरण, डांबरीकरण, काँक्रीटीकरण तसेच दुरुस्तीचे काम जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या माध्यमातून केले जाते. गणेशोत्सवापूर्वी रस्ते दुरुस्त करण्याचे आदेश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिले होते. तसेच, जिल्हा परिषद अखत्यारित येणाऱ्या अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती झाल्याचा दावा भोसले यांनी केला आहे. परंतु, निधी अभावी अनेक भागातील खराब रस्त्याची दुरुस्ती झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणारे •➤ पान २ वर

> **गणेशोत्सवापुर्वी रस्ते दुरुस्त करण्याच्या सुचना बांधकाम विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार ग्रामीण भागातील अनेक रस्ते दुरुस्त करण्यात आले आहेत.**
>
> **– नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

## एसटी बसची दुचाकीला धडक
# तरुणीचा दुर्देवी मृत्यू




। नागोठणे । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावर एस.टी. बसने स्कुटीला जोरदार धडक दिल्याने स्कुटी चालक तरुणीचा अपघात होऊन त्यात ती गंभीर जखमी झाल्याने तिचा दुदैवी मृत्यू झाला. तर, मागे बसलेला तिचा भाऊ देखील जखमी झाला आहे. देवयानी किशोर गोळे (१९) असे मृत तरूणीचे नाव असून सुजल गोळे (१५) असे जखमी भावाचे नाव आहे.

सोमवारी (दि.१) दुपारच्या सुमारास देवयानी आपल्या भावासोबत स्कुटीवरून मुंबई-गोवा महामार्गावरून देवकान्हे येथे चालली होती. त्याचवेळी पाठीमागून येणाऱ्या खेड आगाराची मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव एसटी बसने स्कुटीला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात देवयानीच्या डोक्याला व शरीराला गंभीर जखमा झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तर, तिच्या पाठीमागे बसलेला तिचा भाऊ सुजल हा जखमी झाला. या अपघातानंतर मृत तरुणीचे पार्थिव नागोठणे प्राथशिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले होते. सीकेटी कॉलेजमध्ये बीएमएसचे शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या या तरुणीचा मृत्यू झाल्याने ऐनवहाळ गावावर शोककळा पसरली आहे. या अपघातामधील एसटी बसचा चालक जितेंद्र अवसरमल याला ताब्यात घेण्यात आले आहे. या अपघाताची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली हे.कॉ. आबा गायकवाड हे पुढील तपास करीत आहेत.

# येरद येथील वृद्धेच्या खुनाचा उलगडा



। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील येरद गावात घडलेल्या खळबळजनक खुन व चोरी प्रकरणाचा उलगडा करत पोलिसांनी आरोपीला अवघ्या काही दिवसांत अटक केली आहे. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात १० मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीने संगीता मनोहर मोकाशी (७०) यांच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली. •➤ पान २ वर

## भाविकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन?

। मुंबई । प्रतिनिधी ।

लालबागचा राजा गणेशोत्सव पंडालातील व्हीआयपी आणि सामान्य दर्शन या वेगळ्या व्यवस्थेविरोधात दाखल केलेल्या तक्रारीची राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी राज्य सरकार तसेच संबंधितांनी लेखी उत्तर सादर करावे, असे निर्देश मानवाधिकार आयोगाने दिले आहेत. ॲड. आशिष राय आणि ॲड. पंकज मिश्रा यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर सुनावणी करताना आयोगाने या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकार, मुंबई पोलीस आयुक्त, लालबाग मंडळ सचिव, मंत्रालय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांना नोटीस बजावली आहे.

# मराठ्यांचे आंदोलन हाताबाहेर

**न्यायालयाकडून सरकारची खरडपट्टी**

। मुंबई । प्रतिनिधी ।

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर गेल्या ४ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केलं आहे. मात्र, राज्य सरकारकडून त्यांच्या आंदोलनास परवानगी नसल्याचे सरकारच्यावतीने सोमवारी (दि.१) न्यायालयात सांगण्यात आले. तसेच, आझाद मैदानातील आंदोलनाबाबत हायकोर्टात दाखल याचिकांवर सुनावणी देखील संपन्न झाली. मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला आज दुपारपर्यंत मुंबई रिकामी करण्याचे महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.

मराठा आंदोलनाबाबत उच्च न्यायालयात सोमवारी (दि.१) सुनावणी पार पडली. यावेळी दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद करण्यात आले. राज्य सरकारच्यावतीने महाधिवक्त्यांनी आंदोलकांनी सर्व नियम पायदळी तुडवल्याचे स्पष्टीकरण न्यायालयात दिले. तर, जरांगेच्या •➤ पान २ वर



### मंत्रालय परिसरात कडेकोट बंदोबस्त

**मंत्रालय परिसरात सोमवारी (दि.१) कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आला होता. मंत्रालयाभोवती तीन पातळ्यांच्या बॅरिकेड्स लावण्यात आल्या. त्यातील प्रत्येक प्रवेशद्वारावर आंदोलनकर्त्यांची गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त सुरक्षा दलाला पाचारण करण्यात आले होते. मरीन ड्राईव्ह परिसरात आंदोलन तीव्र झाल्याने मंत्र्यांच्या निवासस्थानांबाहेरही सुरक्षा वाढवण्यात आली. दरम्यान, सोमवारी कामकाजासाठी मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कार्यालयात परतणार असल्याने वाहतूक विस्कळीत होऊ नये म्हणून पोलिसांनी वाहतूक बदलाची माहिती दिली.**

### आज सुनावणी

**मराठा आरक्षणासाठी मुंबईत आझाद मैदान येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालीआंदोलन सुरु आहे. याबाबत न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सोमवारी तातडीने सुनावणी घेण्यात आली. सोमवारची सुनावणी पूर्ण झाली असून आज (दि.२) दुपारी ३ वाजता पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यानंतरच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाविषयी न्यायालयाकडून आदेश देण्यात येण्याची शक्यता आहे.**

**भूमीपूजन होऊन पाच वर्षे उलटली | स्थानकात एक विटही रचली गेली नाही**

# बस स्थानकाचे नूतनीकरण गुलदस्त्यातच

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागमधील जून्या एसटी बस स्थानकाच्या जागी नवीन स्थानक उभारणीसाठी पाच वर्षापूर्वी भूमीपूजन करण्यात आले होते. परंतु, या बसस्थानकाचे नुतनीकरण गुलदस्त्यातच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नव्या एसटी बस स्थानकाचे स्वप्न कधी पुर्ण होणार, असा सवाल जनमानसातून उमटत आहे.

अलिबाग एसटी बस स्थानक ४० वर्षांहून अधिक जूने आहे. प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जीर्ण झालेल्या अलिबाग बस स्थानकाच्या जागी नवीन एसटी बस स्थानक बांधण्याचा निर्णय त्यावेळी सरकारने घेतला होता. तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या प्रमुख उपस्थितीत २८ ऑगस्ट २०१८ रोजी मोठ्या थाटामाटात नवीन स्थानकाच्या कामाचे भूमीपूजन झाले होते. कामाची हालचालही सुरु झाली होती. तसेच, अलिबाग स्थानकातील मातीचे परीक्षण २०१९ मध्ये पुणे •➤ पान २ वर



**नियोजित बसस्थानकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| जागेचे एकूण क्षेत्रफळ १९ हजार ५३० चौ.मी. | बस स्थानकाचे क्षेत्रफळ ७ हजार ६३० चौ.फुट | सर्वे नंबर : ७७८, १२९८ |
| आगाराचे क्षेत्रफळ ११ हजार चौ.मी. | आगार निवासस्थानाचे क्षेत्रफळ ९०० चौ.फुट | वास्तूविशारद गोडबोले मुकादम अॅन्ड असोसिएट्स |

### आगाराच्या दूरावस्थेबाबत दुर्लक्ष

**नोकरी व्यवसायाबरोबरच पर्यटन स्थळ म्हणून अलिबागला येणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड वाढली आहे. एसटी बसने दिवसाला प्रवास करणाऱ्यांची संख्या २० हजार पेक्षा अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांसह पर्यटकांना वाहतूकीच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी अलिबाग आगारातून प्रयत्न केला जात आहे. मात्र, याच अलिबाग आगाराची अवस्था दयनीय झाली आहे. सतत स्लॅब कोसळणे, कार्यालयात पाणी शिरणे असे प्रकार घडत असल्याने कर्मचाऱ्यांची सुरक्षा देखील वाऱ्यावर आहे.**

## कासारमलई येथे रिक्षाला अपघात
# तीन जणांचा मृत्यू

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील कासारमलई येथील तीव्र उतारावर रविवारी (दि.३१) दुपारच्या सुमारास प्लाजो ऑटो रिक्षाचा भीषण अपघात झाला. या अपघातात चालकासह तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. तर, अन्य तिघांवर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली. या अपघातातील रिक्षा चालकाचे नाव संतोष सावंत (४०) असे असून ते कणघर येथील ठाकरे गटाचे शाखाप्रमुख होते.

मिळालेल्या माहितीनुसार, संदेरी येथील समाजाची बैठक आटपून रिक्षा चालक तथा कणघर येथील ठाकरे गटाचे शाखाप्रमुख यांच्यासह एकूण पाचजण प्लाजो रिक्षाने कणघर येथे परतत होते. त्यावेळी ताम्हाणे शिर्केच्या पुढे कासारमलई येथील तीव्र उतारावर रिक्षाचा ब्रेक निकामी झाला. त्यामुळे रिक्षा चालक संतोष सावंत यांचा रिक्षावरील ताबा सुटला आणि रिक्षा येथील सिमेंटच्या दिशादर्शकावर आदळून भीषण अपघात झाला, •➤ पान २ वर





कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# वडवलीत प्लास्टिकमुक्त गाव उपक्रम यशस्वी

## • रायगड मी मराठी प्रतिष्ठानचा पुढाकार



। म्हसळा । वार्ताहर ।

वडवली पर्यावरण रक्षणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलत, रायगड मी मराठी प्रतिष्ठान यांच्यावतीने प्लास्टिकमुक्त गाव अभियानाचे आयोजन वडवली गावात करण्यात आले. या उपक्रमांतर्गत गावकऱ्यांमध्ये प्लास्टिकच्या वापरामुळे होणारे पर्यावरणीय व आरोग्यविषयक दुष्परिणाम समजावून देण्यात आले.

पर्यायी पर्यावरणपूरक साहित्याचा स्वीकार व उपयोग कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गावात जनजागृती रॅली आणि माहिती सत्राचे आयोजन ग्रामस्थांच्या सहभागाने गावातील स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यात आली. यावेळी १५० पेक्षा अधिक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांनीही या उपक्रमाला मनापासून साथ देत परिसर स्वच्छ केला, प्लास्टिक कचरा गोळा केला आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा निर्धार केला. या अभियानामुळे वडवली गावात प्लास्टिकविरहित वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही या उपक्रमाला सातत्याने चालू ठेवण्याचा निर्धार प्रतिष्ठानच्या सदस्यांनी व ग्रामस्थांनी केला आहे. रायगड मी मराठी प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे, आणि इतर गावांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

# कोलाड रेल्वे फाटकाजवळ जीवघेणे खड्डे

। कोलाड । वार्ताहर ।

कोलाड भिरा फाटा येथील कोलाड रेल्वे फाटका जवळ भले मोठे खड्डे पडल्यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवासी नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असुन कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर उपाययोजना केली जाईल काय? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

वरसगांव-भिरा मार्गावर विले भागाड परिसरात मोठमोठे कारखाने आहेत त्यांची जड अवजड वाहतूक याच मार्गाने सदैव राजरोसपणे सुरू असते दिवसा गणित दररोज अपघातांची मालिका सुरूच आहे. मोठ मोठे स्टील कॉइल वाहतूक करणारे ट्रेलर पलटी होतात यावर कोणाचेच नियंत्रण नाही. तसेच याच मार्गांवरून कोकण रेल्वेची रो रो सेवा सुरु असुन या मार्गांवरून असंख्य अवजड माल वाहतूक वाहने ये-जा करीत असुन या अवजड वाहनांमुळे या मार्गांवर मोठं मोठे खड्डे पडले असून नागरिकांना या खड्ड्यांतून प्रवास करून मार्ग काढावा लागतो हे दुर्दैव म्हणावे लागेल.

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

### जाहीर सुचना

या सुचनेद्वारे बँकेच्या माथेरान शाखा (नेरळ वि. कक्ष) ता. कर्जत व नागांव, रेवतळे फाटा (विन्हेरे वि.कक्ष) ता.महाड हे विस्तारीत कक्ष कार्यान्वित करण्यात आले होते. परंतू काही तांत्रिक अडचणीमुळे सदरच्या दोन विस्तारीत कक्षांचे कामकाज दिनांक ०१/१०/२०२५ पासुन बंद करणेत येत आहेत.

माथेरान शाखेतील खातेदारांची खाती नेरळ (तालुका कर्जत) शाखेत व नागांव रेवतळे फाटा या शाखेतील खातेदारांची खाती विन्हेरे (तालुका महाड) शाखेत विलिन करण्यात येत आहेत.

सही/-
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक : ०१-०९-२०२५

# माथेरानमध्ये ओवसा सण साजरा



। नेरळ । प्रतिनिधी ।

गणपती उत्सवात गौराईचे आगमन होत असताना माथेरान मधील महिला मंडळ नेहमीच्या परंपरेत ओवसा साजरा करतात. त्यानिमित्ताने मोठ्या प्रमाणात महिलांनी सहकाऱ्यांसोबत खेळ खेळले आणि खेळांचा आनंद लुटला.

भाद्रपद महिन्यात येणाऱ्या गणेश चतुर्थीला श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. गणेश भक्त आपल्याकडे दीड दिवसांचा तर काही भाविक ही पाच दिवसांसाठी आणि गौरींबरोबर, तर काही भाविक वामन नवमी आणि अनंत चातुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जन करतात. मात्र, गौरींचे आगमन एकाच वेळी होत असते. गौराईच्या आगमनाच्या आदल्या दिवशी तिची मूर्ती आणून ठेवली जाते. तर, अनेक भक्त पहाटे रानात जाऊन गौरी पूजनाच्या पूर्व संध्येपर्यंत कचोऱ्याची फुले (गौरीची फुले) व तेरड्याच्या फुलांसकटच्या फांद्या आणतात. त्यानंतर महिला रात्रभर गाणी गात गौर सजवण्यात गुंततात. माथेरानमधील महिलांनी ही परंपरा जपत गौराईच्या आगमना निमित्ताने सोमवारी (दि.१) ओवसा नेहमीच्या परंपरेत साजरा केला. या सणासाठी महिलांकडून बांबूच्या पातीपासून बनवलेल्या सुपांची खरेदी केली होती. पूजा साहित्यांनी भरलेले सूप नाचवत माथेरान मधील महिलांनी ओवसा साजरा केला.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक श्री निखील अरविंद सोंदे यांजकडून भाग दाखला/शेअर सर्टिफिकेटद्वारे कायमची ट्रान्सफर करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे-पुलाचीवाडी (वंजारवाडी), तालुका-कर्जत, जि.रायगड येथील कोकण कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्यादीत भालिवडी (सावळा) पो.कडाव, ता.कर्जत जि. रायगड यांचेकडील भाग दाखला/शेअर सर्टिफिकेट क्र. ५१३ मधील जमिन मिळकत

सदरची जमीन मिळकत या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती भाग दाखला/शेअर सर्टिफिकेटद्वारे ट्रान्स्फर करणेचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना ट्रान्स्फर करण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार शेअर ट्रान्स्फर तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल भाग दाखला/शेअर सर्टिफिकेटद्वारे ट्रान्सफर करणेचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. / /२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्बल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## पान १ वरून

### रस्ते दुरुस्तीचा दावा फेल

५० किलो मीटरचे रस्ते खराब झाले आहेत. शासनाकडून निधी उपलब्ध झाला नाही, त्यामुळे या रस्त्यांची दुरुस्ती करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरले आहे. यंदाही गणेशोत्सवात भक्तांना खडड्यातून प्रवास करण्याची वेळ आली. खड्डेमय रस्त्यांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचो या कालावधीत प्रचंड हाल झाले. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या गलथान कारभाराचा तीव्र संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### येरद येथील वृद्धेच्या खुनाचा उलगडा

त्यानंतर त्यांच्या कानातील, गळ्यातील व हातातील सोन्याचे दागिने तसेच मोबाईल घेऊन आरोपी पसार झाला. या मारहाणीमुळे संगीता मोकाशी यांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले होते. त्यामुळे रायगड पोलिसांपुढे तपासाचे मोठे आव्हान उभारले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, माणगाव तालुक्यातील येरद येथील संगीता मोकाशी यांच्या घरात १० मे रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास जबरी चोरीसाठी आरोपी घुसले होते. त्यांच्याकडून संगीता यांना निर्दय मारहाण करून सोन्याचे दागिने व मोबाईल लंपास केले. त्यात संगीता यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर परिसरात भीती व संतापाचे वातावरण पसरले होते. दरम्यान, माणगाव पोलिसांनी सीसीटीव्ही फूटेज व गुप्त बातमीदारांकडून माहिती गोळा केली. तसेच, तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपीचा शोध घेण्यात आला. पोलिसांच्या अथक प्रयत्नांनंतर आरोपीचे नाव उघड झाले. येरद आदिवासीवाडीतील कल्पेश बबन जाधव (२२) असे आरोपीचे नाव आहे.

कल्पेश जाधव हा रेशन आणण्यासाठी येरद गावात गेला होता. त्यावेळी त्याने एका वृद्ध महिलेला घरात एकटी असल्याचे पाहून त्यांच्या घरात प्रवेश केला. पाणी मागण्याचा बहाणा करून त्याने तिच्या गळ्यातील सोन्याचे पोत खेचले. महिला प्रतिकार करेल या भीतीने आरोपीने तिचा गळा दाबून हालचाल थांबवली व बेन्टेक्सच्या चार बांगड्या व कर्णफुले दागिने, मोबाईल घेऊन पसार झाला. त्याला २९ ऑगस्ट रोजी रात्रीच्यासुमारास पोलिसांनी आरोपीला शिताफीने अटक केली असून त्याला दुसऱ्या दिवशी माणगाव येथील न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्याच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याचे काम सुरू आहे.

ही कारवाई रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय अधिकारी शंकर काळे व पुष्कराज सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व त्यांच्या पथकाने केली आहे. त्यामुळे पोलिसांच्या चिकाटी व वेगवान कारवाईमुळे गावकऱ्यांमध्ये दिलासा व पोलिसांबद्दल कृतज्ञता व्यक्त होत आहे.

### मराठ्यांचे आंदोलन हाताबाहेर

वकिलांनी सरकार योग्य अंमलबजावणी न केल्याने आंदोलकांचे मोठे नुकसान झाल्याचा युक्तिवाद केला.दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात मराठा आंदोलनामुळे मुंबईला छावणीचे स्वरूप आले आहे. आंदोलकांना दक्षिण मुंबईत प्रवेश देऊ नये, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, आझाद मैदान वगळता मरिना ड्राईव्ह, लोढा फाउंटन आणि दक्षिण मुंबईतील इतर भागातून आंदोलकांना मंगळवारी (दि.२) दुपारपर्यंत बाहेर काढण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. या आदेशांचे पालन होतेय की नाही, हे पाहण्यासाठी मंगळवारी दुपारी तीन वाजेपर्यंत पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यानुसार, आता मराठा आरक्षणासंदर्भात दाखल सर्व याचिकांवर मंगळवारी दुपारी तीन वाजता सुनावणी घेण्यात येणार आहे.

मराठ्यांचे अन्न, पाणी बंद?

मराठा नेते मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टला मुंबईत दाखल झाले. त्यांनी मुंबईत आझाद मैदानात उपोषणाला सुरुवात केली. त्यांनी सोमवारपासून पाणी पिणंदेखील बंद केले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या पहिल्या दिवशी मराठा आंदोलकांची मुंबईत प्रचंड गैरसोय झाली होती. मुंबईत एकीकडे मुसळधार पाऊस पडत होता. तर, दुसरीकडे आझाद मैदानादवळची खाऊ गल्ली, हॉटेल्स बंद होत्या. हे सर्व सरकारच्या आदेशानुसार बंद असल्याचा आरोप आंदोलकांकडून केला जात होता.

### तीन जणांचा मृत्यू

अशी माहिती पोलीस निरीक्षक संदिप कहाले यांनी सांगितले. या भीषण अपघातात रिक्षा चालक तथा कणघर येथील ठाकरे गटाचे शाखाप्रमुख संतोष नानासाहेब सावंत (४०) यांचा जागीच मृत्यू झाला. तर, शांताराम काळीदास धोकटे व शर्मिलाबाई तुकाराम धोकटे यांच्यावर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते. परंतु, उपचारादरम्यान या दोघांचाही मृत्यू झाला आहे. तसेच, या अपघातात प्रकाश धाडवे, कविता मगर आणि संतोष मगर हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### बस स्थानकाचे नूतनीकरण गुलदस्त्यातच

येथील डिरोक्ट्रीक इंजिनिअरिंग या कंपनीकडून करून नुतन इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला होता. या प्रकल्पासाठी ६ कोटी २८ लाख रुपये खर्च अपेक्षीत होते. तसेच, ७ हजार ६३० चौरस फुट इतक्या क्षेत्रावर नवीन स्थानकाचे बांधकाम करण्यात येणार होते. तळ मजला व पहिला मजला अशा पद्धतीने बस स्थानकामध्ये इमारत होणार होती. स्थानकातील तळ मजल्यामध्ये १४ फलाटांचे नियोजन होते. त्यात प्रवाशांसाठी खास प्रतिक्षालय, उपहारगृह, प्रसाधनगृह, पार्सल खोली, महिलांसाठी हिरकणी कक्ष, आरक्षण कक्ष, स्थानक प्रमुख कार्यालय असणार होते. त्याचबरोबर पहिल्या मजल्यावर चालक व वाहकांसाठी विश्रांती कक्ष बांधण्यात येणार होते. त्यामध्ये महिला व पुरुषांसाठी वेगळे कक्ष असणार होते. सुमारे १ लाख प्रवासी ये-जा करण्याची क्षमता नव्या स्थानकात होती. त्यामुळे १८ महिन्यांत म्हणजेच २१ सप्टेंबर २०२१ पर्यंत स्थानकाचे काम पुर्ण होणे गरजेचे होते. परंतु, पाच वर्षे होऊनदेखील या स्थानकात साधी वीटही रचण्यात आली नाही. ज्या जागेत स्थानक बांधणार होते त्या जागेवर सीएनजी पंप उभारण्यात आला आहे. त्यामुळे अलिबागकरांचे नव्या स्थानकाचे स्वप्न आता स्वप्नच राहणार की काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### दरपत्रक

जा.क्र.पमपा/बांधकाम/६५२५/प्र.क्र.१५०/३२४७/२०२५ दिनांक: ०१/०९/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरीता प्री कास्ट गटार बांधणे या कामी दरपत्रक मागविणे. | ०२/०९/२०२५ ते ०९/०९/२०२५ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ०२/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

### परिशिष्ट -१०
### (प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धी/जाहीर सूचनेचा नमुना मराठी) पनवेल महानगरपालिका
### सार्वत्रिक निवडणूक -२०२५
### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्ध करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक | बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर,२०२५ |
| २. | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर,२०२५ ते सोमवार, दिनांक १५ सप्टेंबर,२०२५ (दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

टिपः हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०३/०९/२०२५

सही/-
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांना खालील वर्णनाची मिळकत कायम खुश खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित, बिनजोखमीची असल्याचा भरवसा आमचे अशिलांस जमीन मिळकतीचे विद्यमान मालक १) मे.अविष्कार रीयालटी प्रा.लि २) श्री.भगवान दयाराम जाधव व इतर यांनी दिला आहे. याकरिता सदर मिळकतीबाबत हरकतींची खातरजमा करण्याकामी सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांचे सांगणेवरून त्यांचे वतीने देत आहे.

**मौजे कारीवणे, ता.रोहा, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार | प्रकार |
|---|---|---|---|
| ११/१ | १०-६४-०० | ५.७५ | भातशेती |
| ११/२ | १-९६-०० | १.०६ | भातशेती |
| ११/३ | १-९७-०० | १.०६ | भातशेती |

येणेप्रमाणे उल्लेखित मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकरार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, विक्री, तारण, गहाण, जाणेयेणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी हक्काचे पृष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात, वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलाच्या लाभांत सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ३१/०८/२०२५

**(ॲड. महेंद्र यशवंत धामणे)**
मु.पो सुप्रीम कॉलनी नागोठणे,
ता.रोहा, जि.रायगड
मो.नं. ९७६७२५०११०

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की शॉप क्रमांक ८, ग्लोबल, बिग स्प्लॅश समोर, अलिबाग–रेवस रोड, अलिबाग, रायगड येथे राहणारे श्री. संजय ज्ञानदेव चव्हाण (**"मालक"**) हे म्हाळुंगे बुद्रुक, तालुका मुरुड, जिल्हा अलिबाग येथील (i) सर्व्हे क्रमांक ३३/१/ए असलेला मोजमापीत ९७.४० आर्स; (ii) सर्व्हे क्रमांक ३३/१/बी असलेला मोजमापीत ७२.६० आर्स; आणि (iii) सर्व्हे क्रमांक ३४/३ असलेला मोजमापीत ८५ आर्स या जमिनीच्या सर्व त्या तुकडयाचे आणि खंडाचे (**"जमीन"**) मालक आहेत आणि खाली नमुद केलेले मूळ मालकी हक्काचे कागदपत्रे सध्या मालकांच्या ताब्यात नसून ते हरवले आहेत व परिश्रमपुर्वक शोध घेवुनही ते सापडलेले नाहीत (**"हरवलेले दस्त"**).

(ए) सर्व्हे क्रमांक ३४/३ असलेल्या जमिनीच्यासंदर्भात पहिल्या भागाचे (१) निजामुद्दीन मोहम्मद काटे आणि (२) सिकंदर मोहम्मद काटे आणि दुस—या भागाचे भारती विजय नेवरेकर यांच्या दरम्यान अंमलात आणलेला दिनांक १५ एप्रिल १९९५ रोजीचा विक्री करार;
(बी) सर्व्हे क्रमांक ३३/१/ए असलेल्या जमिनीच्यासंदर्भात दिनांक १६ नोव्हेंबर १९९५ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी, रायगड यांनी पारीत केलेला क्रमांक एसआर१५४/९५ असलेला आदेश;
(सी) सर्व्हे क्रमांक ३३/१/बी असलेल्या जमिनीच्यासंदर्भात दिनांक १६ नोव्हेंबर १९९५ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी, रायगड यांनी पारीत केलेला क्रमांक एसआर१७३/९५ असलेला आदेश;
(डी) सर्व्हे क्रमांक ३३/१/बी असलेल्या जमिनीच्यासंदर्भात अनुक्रमांक ६९ ऑफ १९९६ अन्वये नोंदणीकृत असलेला आणि पहिल्या भागाचे विठोबा चंदर म्हेतर आणि दुस—या भागाचे भारती विजय नेवरेकर यांच्या दरम्यान अंमलात आणलेला दिनांक २८ डिसेंबर १९९५ रोजीचा विक्री करार; आणि
(ई) सर्व्हे क्रमांक ३३/१/ए असलेल्या जमिनीच्यासंदर्भात अनुक्रमांक ६८ ऑफ १९९६ अन्वये नोंदणीकृत असलेला आणि पहिल्या भागाचे यशवंत बाळू दांडेकर आणि दुस—या भागाचे भारती विजय नेवरेकर यांच्या दरम्यान अंमलात आणलेला दिनांक ७ फेब्रुवारी १९९६ रोजीचा विक्री करार.

सर्व व्यक्तीं/एन्टीटींज यांना याद्वारे सूचित केले जाते की त्यांनी हरवलेल्या दस्तांच्या आधारे किंवा त्यांच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार करु नये/व्यवहार पुर्ण करु नये. जर कोणीही हरवलेल्या दस्तांच्या आधारे किंवा अन्यथा जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही अधिकार, मालकी हक्क, हिस्सा, दावा आणि हितसंबंध करत असेल किंवा कोणताही अधिकार, मालकी हक्क, हिस्सा, दावा आणि हितसंबंध आधीच केले असेल तर त्यांना विनंती आहे की त्यांनी याद्वारे खैतान ॲण्ड कंपनी, वकिल यांना वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर—१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. अभिराज गांधी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१० (दहा)** दिवसांच्या आत आवश्यक सहाय्यक कागदपत्रांच्या प्रतींसमवेत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, जमिन आणि/किंवा हरवलेल्या दस्तांसंदर्भात असा कोणताही दावा, अधिकार, मालकी हक्क, किंवा हितसंबंध अस्तित्वात नाहीत असे गृहित धरले जाईल आणि ते माफ केलेले आहेत आणि सोडुन दिलेले आहेत आणि ते मालक आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक नाही असे मानले जाईल.

आज दिनांक २ सप्टेंबर २०२५

**खैतान ॲण्ड कंपनी करीता**
सही /–
अभिराज गांधी
भागीदार

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोठींबे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १५/१/फ | एकूण क्षेत्र ०-५७-०० हे.आर. | ०.३५ |

**मौजे शिंगढोळ, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १७/२ | एकूण क्षेत्र १-१६-०० हे.आर. | ०.८७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- ०२/०९/२०२५
ठिकाण :- पनवेल

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं.९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं.५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

■ नारळ गोटे पाहिजेत-७०६६१३८३६८ * इलेक्ट्रिशन पाहिजे-७०६६१३८३६८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ४८९ | ८२ | २४०/१+३/१ | ०-५७-३ | ९५० चौ.मी. | भूखंड क्र. २०, सेक्टर-१७, क्षेत्र-९५० चौ.मी. | १) श्री. नारायण आंबो नेरूळकर<br>२) श्री. रघुनाथ आंबो नेरूळकर<br>३) श्री. अर्जुन लक्ष्मण नेरूळकर<br>४) श्री. विष्णू दत्तात्रेय नेरूळकर | निरंक |
| | | ११२ | २३७/३ | ०-५३-६ | | | | |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | १-१०-९ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
१२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२३६/२०२५-२६

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक

### ‘एनएमएमटीच्या बसफेऱ्या वाढवा’

**रसायनी :** पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रात नवनवीन कारखानदारी येत असल्यामुळे याठिकाणी कामानिमित्त मुंबई, नवी मुंबई, पनवेल, बेलापूर येथून प्रवासी ये-जा करत असतात. कोरोना काळामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने प्रवाशांचा वाढता कल लक्षात घेता रसायनी (वाशिवली) ते सीबीडी बेलापूर अशी बससेवा सुरू केली. परंतु, सदर बससेवेचा सुव्यवस्थित टाईमटेबल नसल्यामुळे या रसायनी विभागात कमी प्रमाणात बससेवा असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. संध्याकाळी बेलापूर येथून ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान रसायनीकडे एकसुध्दा एनएमएमटीची बस नसल्याने प्रवासी अडकून पडत आहेत. शिवाय, रसायनीकडे येणाऱ्या एनएमएमटीची बस सुस्थितीत नसल्याची दिसत असून, रस्त्यावर कोठेना कोठे बंद पडल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे प्रवासी वर्गाला दुसरी बस येईपर्यंत ताटकळत बसावे लागत आहे व कामाच्या ठिकाणी व घरी पोहोचण्यास उशीर होत आहे. यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने रसायनी (वाशिवली) बससेवा संध्याकाळच्या वेळेस तासाला सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

### ट्रेलर कलंडल्याने वाहतूक ठप्प



**रोहा :** रोहा-भालगाव मार्गावरील कांडणे खुर्द भागात क्रेन वाहतूक करणारा भलामोठा ट्रेलर रस्ता सोडून कलंडल्याने या मार्गावर सकाळपासून वाहतूक ठप्प झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहन चालकांचे हाल झाले आहेत. रोहा तालुक्यातील भालगाव, समुद्र पलीकडील आगारदांडा, दिघी या भागात अनेक प्रकल्प येत असून, त्यानिमित्ताने या भागात अवजड वाहनांची सतत वर्दळ होत असल्याने अपघातांचे प्रमाणदेखील वाढत आहेत. त्यातच या मार्गावर अनेक ठिकाणी नागमोडी वळणे असून, साईडपट्ट्यादेखील खचल्या आहेत. अशा परिस्थिती या सिंगल मार्गावरून अवजड वाहने धावत आहेत. प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात भलेमोठे अवजड वाहनांची वर्दळ वाढत असल्याने या ग्रामीण भागातील लोकांची डोकेदुखी वाढत आहे. आज सोमवारी सकाळी रोहा बाजूकडून क्रेन घेऊन जाणारा कांडणे खुर्द गावाजवळ आल्यावेळी एका धोकादायक वळणावर भला मोठा ट्रेलर रस्त्यातच आडवा होऊन कलंडलला.

### ‘मराठा समाजाला आरक्षण मिळावे’

**पाली/बेणसे :** महाराष्ट्रात मराठा समाजाला आरक्षण मिळावे या भूमिकेतून आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात लाखो मराठा बांधव मुंबईत धडकले आहेत. मुंबईत मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण व जोरदार आंदोलन सुरू आहे. महाराष्ट्रात मराठा आरक्षणाची चळवळ दिवसेंदिवस व्यापक स्वरूप घेते आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी सोमवारी (दि. १) माध्यमांशी बोलताना पक्षाची भूमिका स्पष्ट केली. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अधिकृतपणाची भूमिका आहे, असे त्यांनी म्हटलं आहे. तटकरे पुढं म्हणाले की, मला असं वाटतं की, राज्य सरकारने त्या दृष्टिकोनातून नक्कीच सकारात्मक पावले टाकलेली आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी दोन-अडीच वर्षे त्यांचे आंदोलन निग्रहाने सुरू केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणासाठी त्यांनी मोठी चळवळ उभी केलेली आहे.

# धनदांडग्यांसाठी नियम धुळीस

## जलवाहिनीसाठी रस्त्याची साईडपट्टी खोदली



**विनापरवाना जोरात काम**

**पेज नदीवरील पाणी उचलण्यासाठी पाटबंधारे विभागाची परवानगी घेतली जात नाही आणि रस्त्याची मातीचा भाग खोदण्यासाठी बांधकाम खात्याची परवानगी घेतली जात नाही. त्यामुळे टाकण्याचा आलेल्या जलवाहिन्या कोणा धनदांडग्यांच्या जमिनीवर हिरवे लॉन फुलवण्यासाठी सर्व कायदे मोडून चालल्या आहेत, अशी चर्चा सुरू आहे. कर्जत तालुक्यातील अधिकारी याबाबत सकारात्मक विचार करतील काय, अशी चर्चा सुरू आहे.**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ कशेळे भीमाशंकर राज्यमार्ग आणि भीमाशंकर रस्त्यावरून अंजप कडाव जिल्हा मार्गाच्या बाजूने जलवाहिन्या टाकल्या जात आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व नियम, कायदे धुळीस मिळवून शेकडो एकर जमिनीचे मालकाच्या दिमतीला ती जलवाहिनी टाकली जात आहे. दरम्यान, अशाप्रकारे जलवाहिनी टाकून पेज नदीमधून पाणी उचलण्याची कोणतीही परवानगी नसताना हे काम सुरू असल्याने वाहनचालक संतप्त झाले आहेत. दुसरीकडे मागील दोन महिन्यांपासून रस्त्याच्या बाजूला खोदकाम करून ठेवले असून, कोणत्याही प्रकारची खबरदारी घेण्यात आलेली नाही.

कर्जत तालुक्यात रस्त्यांच्या बाजूने पाइपलाइन किंवा केबल टाकण्याची कामे सर्रास होत असतात. त्यात कोणी आवाज उठवला तर राजकीय नेत्यांचे फोन येतात आणि ती बेकायदा कामे अव्याहतपणे सुरूच असतात. रस्त्याच्या कडेला असलेली मातीची साइडपट्टी खोदण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याची परवानगी न घेता जेसीबी मशीनच्या सहाय्याने खोदकाम केले जाते. मोठ मोठे पाईप टाकले जातात आणि त्यानंतर ते खोदकाम पुन्हा पूर्वी होते तसे न करून ठेवता आपले काम झाले की खोदकाम करणारा ठेकेदार पळून जातो. त्यावेळी त्या खड्ड्यात पडून वाहनचालक जखमी होतात आणि कधी त्यांचे जीवदेखील जातात. मात्र, त्यांचे सोयरसुतक कोणत्याही अधिकाऱ्यांना नाही आणि सार्वजनिक बांधकाम खात्यालादेखील नसल्याचे दिसून येत आहे. मात्र, त्याच सार्वजनिक बांधकाम खात्याकडे परवानगी न घेता खोदकाम केले जात असताना अधिकारी वर्ग तिकडे फिरकत नाहीत. त्यामुळे खोदकाम केल्याने रस्त्याची साईडपट्टी नादुरुस्त होते आणि त्यानंतर रस्तादेखील नादुरुस्त होतो, हे कर्जत तालुक्यात सर्रासपणे सुरू आहे.

टाटा प्रकल्पाच्या वीज केंद्रातून वीजनिर्मिती केल्यानंतर पेज नदीमध्ये ते पाणी सोडले जाते. त्या पाण्यावर पाटबंधारे विभागाचा अधिकार आहे. असे असताना पेज नदीवरील अंजप कळंबोलीजवळील पुलाच्या बाजूने पाणी उचलले गेले आहे. ते पाणी नेण्यासाठी कडाव-अंजप रस्त्याने पेज नदीपासून जलवाहिन्या नेण्यात आल्या आहेत. पेज नदी ते अंजप गाव या भागात नेण्यात आलेल्या जलवाहिन्या यांच्यासाठी मागील दोन महिन्यांपूर्वी रस्त्याची मातीची एक बाजू खोदून ठेवण्यात आली आहे. पुढे या जलवाहिन्या टाकण्यासाठी नेरळ कशेळे हा भीमाशंकर राज्यमार्ग वरील मातीची बाजू खोदण्यात आली आहे. त्या ठिकाणी जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, पण जलवाहिनी टाकल्यानंतर दोन महिन्यांचा कालावधी लोटला तरी रस्त्याची मातीची बाजू बुजवून टाकण्यात आलेली नाही. त्यात आता रस्त्याच्या बाजूला गवत उगवले आहे. त्या गवतामुळे कशेळे रस्त्यावरील मातीचा रस्ता खोदला आहे, हे वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे वाहने खड्ड्यात पडण्याच्या अनेक घटना झाल्या आहेत.

**अधिकारी चिडीचूप**

**त्यात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मालकीचा असलेल्या कडाव अंजप आणि नेरळ कशेळे या दोन्ही रस्त्यावर खोदकाम करण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्यात आलेली नाही. असे सर्व बेकायदा कामे सुरू असताना सरकारी अधिकारी मग गिळून गप्प आहेत**

# आज होणार गौरी गणपतींचे विसर्जन

•> पान १ वरुन :

यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये बुधवार दि.२७ ऑगस्ट रोजी १ लाख २ हजार ४८४ गणेशमुर्तींची प्रतिष्ठापना झाली. गुरुवार दि.२८ ऑगस्ट रोजी दीड दिवसाच्या बाप्पाला जड अंतः करणाने निरोप देण्यात आला. त्यावेळी तलाव, समुद्रासह नदींमध्ये २५ हजार ५५१ गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यात आले. दीड दिवसांच्या गणेशमुर्तींच्या विसर्जनांनंतर रविवारी (दि.१) घरोघरी गौराईचे आगमन झाले. यावेळी १६ हजार १७५ गौराईची प्रतिष्ठापना करण्यात आली. गौराईला सोमवारी (दि.२) भाजी, भाकरीचा नैवेद दाखवून पारंपारिक पेहराव करीत असंख्य सुवासिनींनी गौराईचे पूजन केले. यादरम्यान गणेशोत्सवासह गौराईच्या आगमनाच्या निमित्ताने सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. काही ठिकाणी धावऱ्या (जाखडी) नाच या पारंपारिक नृत्याबरोबरच, कुस्ती स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले. महिला वर्गानेदेखील गौराईच्या आगमनाचे जल्लोषात स्वागत केले. त्यांच्याकडून वस्त्रालंकाराचा साजशृंगार चढवून मुर्ती व मुखवट्याची पुजा करण्यात आली. नाचगाणी, फुगड्या आदी खेळांनी जिल्ह्यात रंगत आणली. पारंपारिक नृत्याबरोबरच मनोरंजनात्मक, भजन किर्तनाचे धार्मिक कार्यक्रम घेऊन गौराईची मनोभावे पुजा करण्यात आली.

जिल्ह्यामध्ये गणेशमुर्तीसह गौरीची मुर्ती व मुखवट्यांचे विसर्जन मंगळवारी (दि.२) केले जाणार आहे. गौराई व गणपतीची मुर्ती डोक्यावर किंवा गाडीवर नेऊन मिरवणूका काढल्या जाणार आहेत. काही ठिकाणी मिरवणूका स्पीकर, खालू बाजे व बेंजोच्या तालावर काढल्या जाणार आहेत. यावेळी ५६ हजार ४६८ गणेशमुर्ती व १६ हजार १७५ गौरीच्या मुर्ती व मुखवट्यांचे विसर्जन ५००हून अधिक ठिकाणी केले जाणार आहे. मिरवणूक सोहळ्याचा आनंदोत्सव जल्लोषात साजरा व्हावा, यासाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे.

> **सात दिवसांच्या गणरायासह गौराईला मंगळवारी निरोप देण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने ठिकठिकाणी मिरवणूक काढली जाणार आहे. मिरवणूकीसह विसर्जनाच्यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वयोवृध्द, लहान मुले व महिलांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. मिरवणूकीत लेझर प्रतिबंधित आहेत. त्यामुळे त्याचा वापर करू नये. हा सण आनंदात व शांततेत साजरा करा.**
>
> **–आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

### दोन हजार पोलिसांची नजर

रायगड जिल्ह्यात आज सात दिवसांच्या गणरायासह गौरीचे विसर्जन करण्यात येणार आहे. या कालावधीत ठिकठिकाणी मिरवणूका देखील काढण्यात येणार आहेत. ढोल ताशांसह डिजेच्या तालावर अनेकजण नाचणार आहेत. त्यामुळे मिरवणुकीच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रायगड पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. यावेळी २ हजार ८०० हून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड जवान तैनात करण्यात येणार आहेत.

### मिरवणूकीत वाद घालणाऱ्यांना दणका



गणेशोत्सवाच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. भारतीय नागरीक सुरक्षा अधिनियम अंतर्गत १ हजार १५० जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यांना नोटीस बजावण्यात आली असून त्यांच्या प्रत्येक संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाणार आहे. यापूर्वी मिरवणूकीत वाद घालणाऱ्यांना दणका देण्यात आला असल्याची माहिती रायगड पोलिसांनी दिली.

# वाहतूक कोंडीची डोकेदुखी कायम

## गणेशोत्सवात प्रवासी, नागरिक मेटाकुटीला

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शनिवार-रविवारची सुट्टी आल्याने शनिवारी मुंबई बाजूकडून कोकणात जाणारी तर रविवारी कोकणातून मुंबई बाजूकडे जाणाऱ्या कोकणवासीय गणेशभक्तांना मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव शहरात पुन्हा एकदा वाहतूक कोंडीची समस्या उफाळून आली. कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या प्रचंड वाहन ताफ्यामुळे तसेच पर्यटकांच्या मोठ्या गर्दीमुळे शहरातील रस्ते ठप्प झाले. या कोंडीचा फटका कोकणवासीय गणेशभक्त, प्रवासी, स्थानिक नागरिक, पर्यटक आणि व्यापाऱ्यांना बसला आहे. माणगावकरांच्या नशिबी वाहतूक कोंडीची डोकेदुखी कायम राहणार असून, ऐन उत्सवात नागरिक मेटाकुटीला आले आहेत.



बाजारपेठ असलेले शहर असून, येथे बाजारपेठेतून जाणारा रस्ता अत्यंत अरुंद असल्याने वाहनांची मोठी रांग लागते. महामार्गावरील वाहतूक जसजशी शहरात वळते, तसतसे शेकडो वाहनांचा तांडा बाजारपेठेत अडकतो. त्यामुळे प्रवासाचा वेळ दुपटीने वाढत असून, प्रवासी हैराण झाले आहेत. गणेशभक्तांना कोकणात पोहोचण्यासाठी तासंतास अडकून बसावे लागत आहे. स्थानिक नागरिकांनाही दैनंदिन कामकाजासाठी व खरेदी व्यवहार करण्यासाठी बाहेर पडताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी आणि त्यात महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या रांगा यामुळे दमछाक होत आहे.

या वाहतूककोंडीमुळे स्थानिक छोट्या-मोठ्या व्यावसायिकांवर या समस्येचा थेट परिणाम जाणवत असल्याने व्यापारीवर्गात नाराजी वाढली आहे. त्यातच उत्सवकाळात वाढलेल्या गर्दीमुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून बाजारपेठेतून जावे लागते. वाहतूक पोलीस व प्रशासनाकडून काही प्रमाणात वाहतूक नियंत्रित करण्याचे प्रयत्न होत असले तरी मूलभूत समस्या म्हणजे रस्त्याची अरुंद रचना आणि शहरातून जाणारा महामार्ग हा मुद्दा कायम आहे. जोपर्यंत इंदापूर आणि माणगाव शहराच्या बायपासचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत हा तिढा कायम राहणार आहे. त्यामुळे नागरिक व प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर वाढला आहे.

## तालुक्यात उत्साह

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला घरोघरी विराजमान झालेल्या गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असून, त्यात आता गौरी आगमनामुळे भक्तिभावाचे नवीन पर्व सुरू झाले आहे. कर्जत तालुक्यातील घराघरांत काल “गौरी घरी आली” आणि आज मोठ्या श्रद्धा व भक्तिभावाने तिची स्थापना करण्यात आली आहे.

पारंपरिक श्रद्धेनुसार गौरी म्हणजे समृद्धी, सौभाग्य आणि पीकबहराचे प्रतीक. स्त्रियांसाठी गौरी आगमन हा एक खास सोहळा असतो. काल महिलांनी सनई-चौघड्याच्या नादात, मंगलगाणी म्हणत गौरीचे स्वागत केले. सोमवारी सकाळपासून घराघरांत फुलांची तोरणे, गजरे, सुंदर रांगोळ्या व विविधरंगी साड्यांनी सजावट करून गौरींची स्थापना करण्यात आली. त्यानंतर संध्याकाळी ओवाळणी, मंगलाष्टके व भजने यांनी वातावरण अधिकच मंगलमय झाले होते.

# रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। कर्जत । प्रतिनिधी ।**



• (छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली येथील नवतरुण ओंकार मित्र मंडळाने माया रक्त केंद्र बदलापूर यांच्या सहकार्याने गणेशोत्सवनिमित्त आयोजित सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत-खालापूर तालुक्यातील ५२२ वे रक्तदान शिबीर होते.

नवतरुण ओंकार मित्र मंडळाच्या वतीने कोकण आळी मध्ये दहिवलीचा राजा प्राणप्रतिष्ठित केला जातो. हे मंडळ अनेक उपक्रम करीत असते. त्यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. मंडळाचे विजय जिनगरे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे, उपाध्यक्ष प्रशांत वारीक, विजय जिनगरे, प्रकाश पातेरे, सचिन मनवे, पराग कोगजे, ओंकार जिनगरे, राज जाधव, नरेश सुर्वे, अमिर मणियार, किरण कांबळे, जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते आदी उपस्थित होते.

रक्त संकलनाचे काम बदलापूर येथील माया रक्त केंद्राच्या प्रिया धैनजे, श्वेता बागुल, राकेश यडके, मनिषा भिसे यांनी केले.

## गणेश विसर्जन घाटाची दुरुस्ती

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

खा. सुनील तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून म्हसळा शहरातील मुख्य हिंगुलडोह विसर्जन घाट परिसरात नव्याने पर्यटन विकास होत असल्याने सद्यःस्थितीत येथे गणेशमूर्ती विसर्जन करण्यात थोडे गैरसोयीचे झाले आहे. गणेशभक्तांना गौरी-गणपतीचे विसर्जन करण्यात गैरसोय होऊ नये यासाठी म्हसळा नगर पंचायतीने पुढाकार घेऊन याच नदीपात्रातील जुने गणेशमूर्ती विसर्जन करण्यात येणाऱ्या मोकळ्या परिसराची स्वच्छता व देखभाल दुरुस्तीचे काम करून गैरसोय दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. मुख्याधिकारी विठ्ठल राठोड यांच्या उपस्थितीत कामाची पाहणी केली.

**पालिकेची सामाजिक बांधिलकी** | **अल्पदरात उपलब्ध होत असल्याने गोरगरिबांना मदत**

# शीतशववाहिन्या नागरिकांसाठी आधार

**दीपक घरत**

**। पनवेल ।**

पालिकेच्या माध्यमातून पालिका हद्दीतील नागरिकांसाठी शववाहिन्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये शीतपेट्या असलेल्या दोन शववाहिन्यांचादेखील समावेश आहे. शीतपेट्या उपलब्ध असलेल्या या शववाहिन्यांमुळे पालिका हद्दीत मृत्यू झालेल्या मात्र मृतकाची आपल्या मूळ गावी अंत्यविधी करण्याची इच्छा असलेल्या नातेवाईकांची मोठी सोय झाली असून, पालिकेच्या या शववाहिन्या मृतकाच्या नातेवाईकांसाठी मोठा आधार ठरत आहेत.



परजिल्ह्यातून कामानिमित्त पनवेल, नवी मुंबई परिसरात वास्तव्याला आलेल्या नागरिकांची संख्या मोठी आहे. पालिकेच्या स्थापनेनंतर पनवेल पालिका हद्दीत राहायला येणाऱ्या कुटुंबाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत आहे. अनेकदा अशा कुटुंबातील व्यक्तीचा दुर्दैवाने मृत्यू होण्याच्या घटना घडत असतात. अशावेळी मृत्यू झालेल्या व्यक्तीचे शव आपल्या मूळ गावी पोहोचविण्यासाठी लागणाऱ्या वेळेमुळे मृतदेह खराब होण्याची शक्यता असल्याने वातानुकूलित खासगी शववाहिनी किंवा ॲम्ब्युलन्सचा वापर केला जात होता.

**चार प्रभागात पाच शववाहिन्या**

**पालिकेतर्फे कोव्हीड काळात एक शववहिनी खरेदी करण्यात आली होती. त्यानंतर २०२३ साली नव्याने चार शववाहिन्या खरेदी करण्यात आल्याने पालिकेकडील शववाहिन्यांची संख्या पाच झाली असून, खारघर वसाहत १, नावडे वसाहतीत १, कळंबोली १, कामोठे १ आणि पनवेल १ अशा पाच ठिकाणी शववाहिन्या उपलब्ध आहेत. ज्यामध्ये दोन शववाहिन्यांमध्ये शीतपेट्यांची सुविधा उपलब्ध आहे.**

> **जिल्ह्याबाहेरील व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्याच्या मूळ गावी शव नेण्यासाठी मोठी कसरत नातेवाईकांना करावी लागत होती. पालिकेच्या शीतपेटी असलेल्या शववाहिन्यांमुळे नातेवाईकांची होणारी गैरसोय काही प्रमाणात दूर झाली आहे.**
>
> **– अशोक मोटे, मा. जिल्हा चिटणीस, उत्तर रायगड भाजपा**

कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



: प्रायोजक :
आरडीसीसी बँक
ISO 9001 - 2015 BANK
जिंका रोज आकर्षक बक्षिस
प्रवेश मूल्य २०० रु.
(फोटो काढण्याचे मूल्य वेगळे आकारले जाईल.)
आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

| | | |
|---|---|---|
| सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६ | समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५ | भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८ |
| जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/ ८१४९६६३८१३ | दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५ | सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१ |
| संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९०० | जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२ | अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३ |
| समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१ | शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५ | गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३ |
| मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९ | कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९ | वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५ |
| अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४ | राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/ ८२३७१३८९७४ | अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७ |
| नंदकुमार मरवडे (खांब) : ८३०८६८८२२९ | मुस्कान खान (पेण) : ८९२८९११३९१ | सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७ |
| सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९ | राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५ | महेश पवार (नागोठणे) : ९२२५४७००३७ |
| सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२ | बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४ | |

स्पर्धेचे स्वरुप
■ आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला ‘कृषीवल’मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
■ स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

# ड्रॅगन हत्तीला नाचवतो?

नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची अखेर शिखर बैठक झाली. मोदी २०१८ नंतर पहिल्यांदाच म्हणजे सात वर्षांनी शांघाय सहकार्य परिषदेसाठी एकत्र होते. पण त्यांच्यात चर्चा झाली नव्हती. यंदा मात्र मोदींसाठी खास लाल गालिचा टाकण्यात आला. त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. भारताचा हत्ती आणि चीनचा ड्रॅगन यांनी एकत्र नृत्य करायला हवे अशी नाट्यपूर्ण भाषा जिनपिंग यांनी वापरली. भारत आणि चीन यांनी सहकार्य वाढवणे हे या दोन्ही देशातील मिळून २८० कोटी लोकांच्या हिताचे आहे असे मोदी म्हणाले. कोणत्याही देशांचे नेते भेटले की अशी शाब्दिक आतषबाजी होतच असते. मध्यंतरी चीनने लडाखमध्ये घुसखोरी केल्यापासून दोन देशांचे संबंध ठप्प होते. ते या निमित्ताने चालू झाले ही चांगली बाब. मात्र 'ड्रॅगन हत्तीला नाचवतो' असा तर प्रकार नाही ना हे तपासायला हवे. ट्रम्प यांच्या आयातशुल्कामुळे सध्या सगळ्या देशांची दाणादाण उडाली आहे. भारतावर तर सर्वाधिक पन्नास टक्के शुल्क लावले आहे. आपल्याला जगाच्या व्यवहारात एकटे पाडण्याचा हा प्रकार आहे. त्या पार्श्वभूमीवर भारताने इतरांशी मैत्री वाढवणे साहजिक आहे. त्याचाच एक भाग म्हणून मोदी जपानला गेले व आता चीनसोबत बैठक केली. मात्र अगदी अमेरिकेसह इतर कोणतेही देश आणि चीन यांच्यात कमालीचा फरक आहे. एक तर इतर देशांच्या सीमा आपल्याला लागून नाहीत. त्यांच्याशी आपले शत्रुत्व नाही. दुसरे म्हणजे त्यांच्याशी व्यापार कितीही कमी किंवा अधिक असला तरी त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवता येऊ शकतो. चीन हा मात्र अत्यंत दगाबाज व हलकट शेजारी आहे. त्यामुळे सध्याच्या त्याच्या गोड शब्दांवर कितपत भरोसा ठेवायचा हे तपासायला हवे. चीनवर ट्रम्पने आधी १८० टक्के आयातशुल्क लावले होते. पण चीनने त्यांनाही जशास तसे उत्तर दिले. त्यामुळे मग त्या शुल्काला स्थगित देणे ट्रम्पला भाग पडले. जो देश अमेरिकेसोबत दादागिरी करू शकतो तो भारताशी कसा वागेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

### चीनचा व्यापारी कावा

मोदी व जिनपिंग यांच्या भेटीनंतर दोन्ही देशांनी जी प्रसिध्दीपत्रके जारी केली आहेत त्यामधील तफावतही या संदर्भात उल्लेखनीय आहे. दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्यासाठी सीमेवर शांतता राखणे व सीमा विवाद सोडवणे आवश्यक आहे यावर भारताने भर दिला आहे. तर चीनने मात्र सरहद्दीवर काय चालले आहे त्यावर व्यापारी संबंध अवलंबून ठेवू नये असे म्हटले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. काल लडाख किंवा उद्या अरुणाचलमध्ये आम्ही घुसखोरी करू, हा प्रदेश आमचाच आहे असा दावा करू आणि तरीही भारताने आमच्यासोबतचा व्यापार थांबवता कामा नये असे चीनचे म्हणणे आहे. भारत आणि चीनमधला व्यापार हा सर्व एकतर्फी मामला आहे. मोदी राज्यावर आल्यापासून म्हणजे २०१४ पासूनच्या दहा वर्षांमध्ये भारतातून चीनला होणारी निर्यात बाराशे ते चौदाशे कोटी डॉलरच्या आसपास राहिली आहे. याउलट याच काळात चीनमधून भारतात होणारी आयात सहा हजार कोटींवरून अकरा हजार कोटी डॉलर इतकी झाली आहे. म्हणजेच आपण शंभर रुपयांच्या वस्तू चीनला विकल्या तर जवळपास हजार रुपयांच्या वस्तू त्यांच्याकडून आयात करीत आहोत. यात अर्थातच चीनची चांदीच चांदी आहे. आपल्या आयात व निर्यातीतील फरक शंभर कोटी डॉलर किंवा सुमारे ९० हजार कोटी रुपये आहे. उलट अमेरिकेसोबतच्या व्यापारात आपण फायद्यात असून आपली निर्यात आयातीपेक्षा चार हजार कोटी डॉलरने अधिक आहे. आता अमेरिकेने आयातशुल्क लागू केल्याने भारतातील कपडे, हिरे, चामड्याच्या वस्तू, कोळंबी किंवा अन्य शेतीमाल यांना दुसऱ्या बाजारपेठा शोधणे आवश्यक आहे. मात्र हा माल चीनमध्ये कितपत खपेल याबाबत शंका आहे. कारण चीनला स्वतःचाच माल खपवण्याची चिंता आहे. चीनला भारताचे जे प्रेम वाढले आहे त्यामागे त्याचे निव्वळ व्यापारी हेतू आहेत. आज चीन हा जगातील वस्तू उत्पादनातला दादा आहे. सर्व जगात टाचणीपासून विमानापर्यंत आणि पायपुसण्यांपासून सौरपॅनेल्सपर्यंत जितका काही माल तयार होतो त्यातला ३५ टक्के एकट्या चीनमध्ये उत्पादित होतो. चीनच्या नंतरच्या क्रमांकावर असलेल्या अमेरिका, जपान, जर्मनी इत्यादी दहा देशांमध्ये मिळून जितका माल तयार होतो त्याहूनही अधिक माल चीन तयार करतो व त्यांची निर्यात करतो.

### देशभक्तीच्या केवळ बाताच?

अमेरिकेच्या निर्बंधानंतर चीनला आपला माल कोणत्या बाजारात खपवावा हीच चिंता आहे. त्यादृष्टीने भारत ही बलाढ्य आणि सोईची बाजारपेठ आहे. म्हणूनच शी जिनपिंग मोदींना भेटण्यास तयार झाले. आज ट्रम्प यांनी भारताला एकटे पाडण्याचा प्रयत्न केलेले असताना मोदींनी चीनशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करणे यात गैर नाही. पण आपण आपल्या हिताचे रक्षण करून ते करायला हवे. पहलगाम हल्ल्यानंतर तुर्कस्तानने पाकिस्तानला मदत केली म्हणून त्या देशावर बहिष्काराची भाषा भारतातर्फे करण्यात आली. पण चीनने पाकिस्तानला उघडपणे शस्त्रे पुरवली व पाकिस्तानी भूमिकेला पाठिंबा दिला तरीही भारताने चीनशी नमते घेतले. आणि आता तर मोदी हे चीनशी मैत्री करायला फारच उत्सुक असल्याचे वातावरण तयार झाले आहे. एकेकाळी हेच मोदी चीनला लाल आँख दाखवण्याची भाषा करीत होते. आता निदान चीनने पाकिस्तानला मदत करण्याचा भारत निषेध करतो हे तरी किमान जिनपिंग यांना मोदी सांगू शकले काय हा प्रश्न आहे. पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानी सरकारचा दहशतवाद आहे ही आपली भूमिका जगातील कोणत्याही देशाने मान्य केलेली नाही. ट्रम्प यांनी तर पाकिस्तानला विशेष मदत दिली व त्यांच्या लष्करप्रमुखांना वॉशिंग्टनमध्ये बोलावून खास खाना दिला. दुसरीकडे चीन बिनदिक्कत पाकिस्तानला क्षेपणास्त्रेविरोधी तंत्रज्ञान देतो आहे. असे असूनही मोदी झुकते माप देणार असतील ते आक्षेपार्ह आहे. स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात मोदी स्वदेशी वस्तू वापरण्याच्या चळवळीबाबत बोलत होते. आणि आता जर चिनी आयातीचा मार्ग खुला होणार असेल तर मोदी सरकारसाठीच नव्हे तर भारतासाठीही ते लाजिरवाणे असेल. मोदी आणि भाजपवाले एरवी सतत देशभक्तीच्या गप्पा मारतात. सीमेवरचे जवान किती कष्टात वावरतात असा दाखला देतात. पण हेच मोदी चीनपुढे शरणागती पत्करणार असतील तर संतापजनक आहे. यापूर्वी लडाखमध्ये चिनी सैन्य भारतात घुसले आहे याचे पुरेसे पुरावे असूनही कोणीही भारतीय हद्दीत आलेले नाही असे वक्तव्य मोदींनी केले होते. चीनचे नाव घेण्याचीही हिंमत त्यांनी कधी दाखवली नाही. आता ते त्याच ड्रॅगनच्या सापळ्यात आणखी फसत असतील तर ते चिंताजनक आहे. स्वदेशी, देशभक्ती या फक्त लोकांना सांगण्यापुरत्या बाता आहेत काय?

विचार

# रिॲल्टी झळाळली, सोनेसाठे सापडले

***अर्थनगरीमध्ये अमेरिकन शुल्कवाढीचे कवित्व सुरुच आहे. या अनुषंगाने पुढे येत असलेली मतमतांतरे दखलपात्र आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने निर्यातदारांना देऊ केलेला २५ हजार कोटींचा बूस्टर डोस आणि जगात डॉलरला पर्याय शोधण्यास सुरुवात झाल्याची माहिती दखलपात्र आहे. याच सुमारास देशात ५३ हजार कोटींच्या मालमत्तांची विक्री झाल्याची आणि ओडिशातही सोन्याचे साठे आढळल्याची बातमी चर्चेत आहे.***



**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये अमेरिकन शुल्कवाढीचे कवित्व सुरुच आहे. या अनुषंगाने भारतीय बाजारपेठेमध्ये घडत असलेले बदल आणि पुढे येत असलेली मतमतांतरे दखलपात्र आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने निर्यातदारांना देऊ केलेला २५ हजार कोटींचा बूस्टर डोस महत्वाचा आधार ठरु शकतो. त्याचबरोबर जगात डॉलरला पर्याय शोधण्यास सुरुवात झाल्याची माहिती दखलपात्र आहे. याच सुमारास देशात ५३ हजार कोटींच्या मालमत्तांची विक्री झाल्याची आणि मध्य प्रदेशपाठोपाठ ओडिशातही सोन्याचे साठे आढळल्याची बातमी दिलासादायक ठरली आहे.

केंद्र सरकार अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या निर्यात प्रोत्साहन मोहिमेअंतर्गत २०२५ ते २०३१ या काळासाठी निर्यातदारांना सुमारे २५ हजार कोटी रुपयांची मदत देण्याची योजना आणण्याच्या विचारात आहे. जगभरातील देशांमध्ये भारतीय उत्पादने पोहोचवण्यासाठी सरकार ही एक नवी योजना आखत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार निर्यातदारांना स्वस्त आणि सुलभ कर्जे देणे हा या मदतीमागील मुख्य उद्देश आहे. वाणिज्य मंत्रालयाने हा प्रस्ताव अर्थ मंत्रालयाच्या खर्च वित्त समितीकडे पाठवला आहे. तो मंजूर झाल्यास भारतीय निर्यातदारांना विशेषतः अमेरिकेच्या करांमुळे निर्माण झालेल्या जागतिक व्यापाराच्या अनिश्चिततेपासून स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करेल. 'ईएफसी'कडून मंजुरी मिळाल्यानंतर, वाणिज्य मंत्रालय केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मंजुरी घेईल. पुढील सहा वर्षांमध्ये (आर्थिक वर्ष २०२५-३१) मोठ्या प्रमाणात, समावेशक आणि शाश्वत निर्यात वाढीला चालना देणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. याअंतर्गत, पारंपारिक पद्धतींच्या पलीकडे जाऊन, विशेषतः एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) तोंड देत असलेल्या मोठ्या समस्यांवर उपाय शोधले जातील. सूत्रांनी सांगितले, की दोन उप-योजनांद्वारे हे अभियान राबवण्याची योजना आहे.

निर्यात प्रोत्साहन योजनेअंतर्गत सरकार विचार करत असलेल्या योजनांमध्ये पुढील सहा वर्षांसाठी ५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त व्याज अनुदान समर्थन समाविष्ट आहे. याशिवाय, पर्यायी व्यापार वित्त पर्यायांना प्रोत्साहन देणे, ई-कॉमर्स निर्यातदारांसाठी क्रेडिट कार्ड प्रदान करणे आणि रोख प्रवाहाच्या कम तरतेवर मात करण्यासाठी इतर आर्थिक व्यवस्था करणेदेखील समाविष्ट आहे. त्याचप्रमाणे, निर्यात दिशा योजनेंतर्गत समाविष्ट केलेल्या प्रस्तावांमध्ये सुमारे ४,००० कोटी रुपयांच्या निर्यात गुणवत्ता मानकांचे पालन करण्यासाठी समर्थन, परदेशी बाजार विकासासाठी ४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करणे समाविष्ट आहे. यासोबतच निर्यातीसाठी ब्रँडिंग, स्टोरेज आणि लॉजिस्टिक्स आणि अधिकाधिक भारतीय उद्योगांना जागतिक मूल्य साखळीत एकत्रित करण्यासाठी क्षमता निर्माण करणे समाविष्ट आहे.

दरम्यान, अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ केनेथ रोगॉफ यांनी अमेरिकेला इशारा दिला आहे. अधिक देशांनी डॉलरपासून स्वतःला दूर केले, तर त्याचा थेट परिणाम अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर होईल. यामुळे व्याजदर वाढू शकतात; परिणामी, कर्ज घेणे आणि परतफेड करणे कठीण होईल. अनेक देश आता अमेरिकेच्या डॉलरच्या साठ्यात घट करण्याचा विचार करत आहेत. ते अमेरिकन ट्रेझरी बिलांमध्ये गुंतवणूक कमी करू शकतात. यामुळे अमेरिकेला बाहेरून पैसे उभारणे महाग होईल. अमेरिका आधीच मोठ्या कर्जात बुडालेली आहे, असे निदर्शनास आणून रोगॉफ म्हणाले की अमेरिकेवर आधीच खूप कर्ज असताना व्याजदर वाढले तर समस्या आणखी वाढतील. भारतातून येणाऱ्या वस्तूंवर ५० पन्नास टक्के कर (टॅरिफ) लादण्याचे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे पाऊल अमेरिकेसाठी हानिकारक असू शकते. सध्या देशापुढे कोणतेही मोठे संकट नसले तरी धोके निश्चितच वाढत आहेत. कर्ज खूप जास्त असते, तेव्हा राजकारणात अस्थिरता येते आणि अचानक मोठा धक्का बसतो, तेव्हा खरे संकट येते. डॉलर कमकुवत झाला आणि युआन किंवा युरोसारखी चलने मजबूत झाली, तर जगाचे आर्थिक चित्र बदलू शकते. भारतासारख्या विकसनशील देशांसाठीही यामध्ये संधी निर्माण होऊ शकतात. डॉलरच्या तुलनेत रुपया वाईट पातळीवर आहे. सध्या एका डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य ८७ रुपयांच्या आसपास आहे. अशा परिस्थितीत, येत्या काळात रोगॉफ यांचे विधान बरोबर ठरले, तर डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य सुधारू शकते.

याच सुमारास देशातील मोठ्या रिअल इस्टेट कंपन्या आपल्या मालमत्ता वेगाने विकत असल्याचे पहायला मिळत आहे. अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून येते की केवळ तीन महिन्यांमध्ये देशातील २८ मोठ्या रिअल इस्टेट कंपन्यांनी सुमारे ५३ हजार कोटी रुपयांच्या मालमत्ता विकल्या आहेत. बंगळुरू येथील 'प्रेस्टिज इस्टेट्स' या कंपनीने सर्वाधिक विक्री केली आहे. शेअर बाजाराच्या आकडेवारीनुसार चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये या २८ सूचीबद्ध रिअल इस्टेट कंपन्यांचे एकूण संयुक्त विक्री बुकिंग ५२,८४२ कोटी रुपये होते. 'प्रेस्टिज इस्टेट्स प्रोजेक्ट्स लिमिटेड'ने २०२५-२६ च्या एप्रिल-जून तिमाहीमध्ये १२,१२६.४ कोटी रुपयांच्या प्री-बुकिंगसह आघाडी घेतली होती. 'डीएलएफ लिमिटेड'ने ११,४२५ कोटी रुपयांचे प्री-बुकिंग मिळवले. त्यात गुरुग्रामच्या लक्झरी निवासी बाजारपेठेने मोठी भूमिका बजावली. याशिवाय 'गोदरेज प्रॉपर्टीज'ने चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून तिमाहीमध्ये ७,०८२ कोटी रुपयांचे विक्री बुकिंग मिळवले तर 'लोढा डेव्हलपर्स'ने ४,४५० कोटी रुपयांच्या मालमत्ता विकल्या. दिल्ली-एनसीआर भागातील 'टीएआरसी लिमिटेड' या रिअल इस्टेट कंपनीने २२५ कोटी रुपयांची मालमत्ता विकली. मुंबईतील 'अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लिमिटेड'ने १५०.६ कोटी रुपयांची घरे, जागा विकल्या. 'आर्केड डेव्हलपर्स लिमिटेड'ने एप्रिल-जून तिमाहीमध्ये १४२ कोटी रुपये किमतीच्या, अजमेरा रिॲलिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने १०८ कोटी रुपयांच्या तर सूरज इस्टेट डेव्हलपर्स लिमिटेडने ८१ कोटी रुपयांच्या मालमत्ता विकल्या आहेत.

ओडिशामध्ये सोन्याच्या सहा मोठ्या खाणी सापडल्या आहेत. त्यात वीस टन सोने सापडण्याची अपेक्षा आहे. भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण खात्याने ताज्या अहवालात म्हटले आहे की ओडिशामधील देवगड, सुंदरगड, नबरंगपूर, केओंझार, अंगुल आणि कोरापूट या सहा जिल्ह्यांमध्ये सोन्याचे साठे आहेत. ओडिशा सरकारने लवकरच या खाणींचा लिलाव करण्याचे संकेत दिले आहेत. देवगड जिल्ह्यातील अॅड्स-रामपल्ली परिसरात शोध पूर्ण झाला आहे. ओडिशा खाण महामंडळ आणि भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण एकत्रितपणे लिलावाची तयारी करत आहेत. ओडिशामधील हा पहिला सोन्याचा ब्लॉक असेल, ज्याचा लिलाव केला जाईल. येथे केवळ सोनेच नाही, तर तांबे, निकेल, चांदी आणि ग्रेफाइटदेखील सापडले आहेत. याचा अर्थ असा, की हा परिसर मौल्यवान खनिजांनी समृद्ध आहे. केओंझार जिल्ह्यातील गोपूर-गाझीपूर, मानकडचुआन आणि दिमिरमुंडा भागातही सोन्याचा शोध सुरू आहे. 'जीएसआय'च्या अहवालानुसार सर्वेक्षणातून हे स्पष्ट झाले आहे की सहा जिल्ह्यांमध्ये वीस टनांपेक्षा जास्त सोने आहे. येथे मोठ्या प्रमाणात खाणकाम शक्य असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

येथे पर्यावरण संरक्षण लक्षात घेऊन खाणकाम केले जाईल. नैसर्गिक संसाधनांना हानी पोहोचणार नाही याची खात्री करेल, असं सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षण लक्षात घेऊन खाणकाम केले जाईल. आधुनिक तंत्रज्ञान नैसर्गिक संसाधनांना हानी पोहोचणार नाही याची खात्री करेल, असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सोने योगायोगाने सापडत नाही. उलट, ती एक वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रक्रिया आहे. भूगर्भशास्त्रज्ञ सोने शोधण्यासाठी खडक आणि मातीच्या संरचनेचा अभ्यास करतात. सोने योगायोगाने सापडत नाही, उलट ती एक वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रक्रिया आहे. भूगर्भशास्त्रज्ञ सोने शोधण्यासाठी खडक आणि मातीच्या संरचनेचा अभ्यास करतात. माती आणि पाण्याच्या नमुन्यांमध्ये सोन्याचे कण पुष्ट होतात. जमिनीतील संरचनेचे मूल्यांकन चुंबकीय आणि गुरुत्वाकर्षण पद्धतींनी केले जाते. खोलवर ड्रिलिंग करून नमुने काढले जातात आणि तपासणी केली जाते. उपग्रह इमेजिंग आणि ड्रोन सर्वेक्षण पृष्ठभागावरील खनिज चिन्हे ओळखतात. या सर्व पावलांनंतरच सरकार खाणकामाला परवानगी देते आणि खाणीचा लिलाव केला जातो. भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणात सोने आयात करतो. देशांतर्गत पातळीवर उत्पादन वाढले तर आयातीवरील अवलंबित्व कमी होईल.

चर्चा आजची

# खेळाडूंचा विचार होणे गरजेचे



**प्रमोद जाधव**

रायगड जिल्ह्याला कबड्डीची पंढरी म्हणून ओळखले जाते. याच जिल्हयातून कबड्डीबरोबर कुस्ती, खोखो, पोहणे, धावणे व कराटे सारख्या क्रीडा प्रकारात यश संपादन करून रायगड जिल्ह्याचे नाव देशाच्या कानोकोपऱ्यात पोहचणारे खेळाडू तयार झाले आहेत. रात्रीची दिवस करून घाम घालून सुवर्ण कामगिरी करणारे खेळाडू आपल्या गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे नाव लौकिक करतात. त्यांच्यामुळे आपल्या जिल्ह्याचा सन्मान होतो. त्यामुळे या खेळाडूंना चांगल्या सुविधा, आर्थिक मदत मिळाली पाहिजे. या दृष्टीने प्रशासनाने दखल घेणे गरजेचे आहे. या खेळाडूंचा विचार होणेदेखील आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्याला पुर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे भाताचे क्षेत्र कमी झाले. त्यामुळे औद्योगिक जिल्हा म्हणून नावारूपाला येऊ लागला आहे. जिल्ह्याला निसर्गाचे मोठे देणे आहे. सुंदर असा समुद्रकिनारा, नारळ पोफळीच्या बागा पर्यटकांना कायमच आकर्षित करीत आहेत. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीनेदेखील जिल्ह्याला महत्व प्राप्त झाले आहे.

रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागात गावागावात वेगवेगळे कबड्डी, खोखोचे संघ तयार झाले आहेत. गावातल्या मैदानात सराव करतात. अलिबागमध्ये जिल्हा क्रीडा संकुल आहे. भले मोठे क्रीडा संकूल आहे. परंतु या क्रीडा संकुलाचा वापखेळाडूंसाठी फारसा होत नसल्याचे चित्र आहे. खराब धावपट्टी, खेळाडूंसाठी राहण्यासाठी असणारे हॉस्टेलची अवस्था बिकट आहे. स्विमींग पूलाची वेळेवर देखभाल केली जात नाही. त्यामुळे खडतर प्रवास करत खेळाडूंना या मैदानात सराव करावा लागत आहे.

रायगड जिल्ह्यातून अनेक तरुण तरुणींनी खेळामध्ये यश संपादन केले आहे. राज्य, राष्ट्रीय पातळीवर आपल्या रायगड जिल्ह्याचे नाव लौकिक केले आहे. धावण्याच्या स्पर्धेपासून कराटे, कुस्ती या सांघिक खेळाबरोबरच पोहण्याच्या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर झेप घेणारे खेळाडूदेखील याच रायगडच्या भूमीतून तयार झाले आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये पुर्णवेळ जिल्हा क्रीडा अधिकारी नाही ही मोठी शोकांतिका आहे. माणगावचे तालुका क्रीडा अधिकारी यांच्याकडे जिल्हा क्रीडा अधिकारी अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर त्या पदावरून त्यांना काढून त्यांच्या जागी पेणचे तालुका क्रीडा अधिकारी यांच्याकडे जिल्हा क्रिडा अधिकारी म्हणून अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी पुर्णवेळ जिल्हा क्रीडा अधिकारी यांची नियुक्ती न केल्याने त्यांच्या जागी तालुका क्रीडा अधिकारी यांच्या मार्फत क्रीडा विभागाचा कामकाज चालविला जात आहे. क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्त्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक युवतींमध्ये क्रीडा विषयक वातावरण तयार व्हावे तसेच क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे या हेतूने क्रीडा विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. परंतु त्यांना पाहिजे तशा सुविधा मिळत नसल्याने क्रीडा विभागाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली जाते.

हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्म दिवसानिमित्त रायगड जिल्हयात नुकताच राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. अलिबागमध्ये मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. १५ व १७ वर्षाखालील मुले व मुली, खुला गट पुरुष व महिला वयोगटासाठी तीन किलो मीटर धावण्याची ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत विजेत्या ठरणाऱ्या खेळाडूंना तीन हजार, दोन हजार व एक हजार असे रोखीत बक्षीस ठेवण्यात आले होते. त्याची जाहीरातही सोशल मिडीयावर व्हायरल करण्यात आली होती. रोखीत बक्षीस मिळणार म्हणून जिल्ह्याभरातून शंभरहून अधिक खेळाडू या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते. यातील प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना चषक देऊन गौरविण्यात आले. परंतु रोखीत बक्षीस देण्यात आले नाही. त्यामुळे विजेत्या खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना जाब विचारला. मात्र क्रीडा अधिकाऱ्यांकडून खेळाडूंची हेळसांड होण्याबरोबरच फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तीन गटातील एकूण १८ विजेत्यांची फसवणूक झाल्याचे बोलले जात आहे.

आपल्या जीवाची पर्वा न करता, जिल्हा, तालुक्यासाठी खेळणाऱ्या खेळाडूंचा सन्मान होणे गरजेचे आहे. त्यांना पुढे जाण्यासाठी प्रशासनाकडून आर्थिक मदत करणे आवश्यक आहे. तरच या खेळाडूंना अधिक गती मिळणार आहे. त्यांच्यामुळे आपला सन्मान होणार आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे.

लोकसंसद

## चटका लावून जाणारी अकाली एक्झिट

छोट्या पडद्यावर विविध भूमिका करून घराघरात पोहचलेली दमदार अभिनेत्री प्रिया मराठे हिचे कर्करोगाने वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी निधन झाले. तिच्या अशा अकाली निधनाने मनोरंजन विश्वासह प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. गेल्या काही दिवसांपासून ती आजारी होती मात्र ती अशी अचानक जाईल असे कोणालाही वाटले नव्हते. प्रिया मराठे हिने केवळ मालिकांमध्येच नव्हे चित्रपटातही भूमिका केल्या पण ती लक्षात राहिली ती दूरचित्रवाणीवरील तिच्या दमदार भूमिकांसाठीच. या सुखांनो या... या मालिकेद्वारे तिने अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यानंतर तिने कसम से या हिंदी मालिकेत अभिनय केला. तू तिथे मी या मराठी मालिकेत तिने नकारात्मक भूमिका केली तिची ही भूमिका देखील प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. जयोस्तुते, चार दिवस सासूचे, तू तिथं मी, संभाजी अशा गाजलेल्या



मालिकेतही तिने भूमिका केल्या मात्र प्रेक्षकांच्या लक्षात राहिली ती तिची पवित्र रिश्ता या हिंदी मालिकेतील भूमिका. या भूमिकेने तिला राष्ट्रीय स्तरावर पोहचवले. पवित्र रिश्ता नंतर तिने उतरण, कसम से या हिंदी मालिकेतही भूमिका केल्या. मालिकांप्रमाणेच तिने काही चित्रपटही भूमिका केल्या. विघ्नहर्ता महागणपती, किरण कुलकर्णी वर्सेस किरण कुलकर्णी , १२३४, ती आणि इतर या मराठी चित्रपटात तिला अभिनय करण्याची संधी मिळाली या संधीचे तिने सोने केले. तुझेच गीत मी गात आहे ही तिची शेवटची मालिका. ही मालिका सुरू असतानाच तिला कर्करोग झाल्याचे निदान झाले त्यामुळे तिने ही मालिका अर्धवट सोडली. कर्करोग सारख्या असाध्य रोगावर मात करून ती पुन्हा एकदा रुपेरी पडदा गाजवेल अशी अपेक्षा प्रेक्षकांना होती मात्र ही अपेक्षा फोल ठरली आणि रविवारी तिने अंतिम श्वास घेतला. तिची अकाली एक्झिट प्रेक्षकांच्या मनाला चटका लावून जाणारी ठरली. प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या हरहुन्नरी अभिनेत्रीला भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

दिनविशेष

# लोकप्रिय संगीतकार श्रीनिवास खळे

श्रीनिवास खळे हे मराठी संगीतकार होते. त्यांनी आपल्या कर्णमधुर आणि भावपूर्ण गीतांनी मराठी रसिकांना सहा दशकांहून अधिक काळ मोहिनी घातली होती. त्यांना प्रेमाने खळे काका म्हणून संबोधले जात असे. हिंदी, संस्कृत, गुजराती, बंगाली इत्यादी भाषांमधील गीतांना खळेअण्णांनी जरी स्वरबद्ध केले असले तरी त्यांचे खरे योगदान हे मराठी भावगीत या गीतप्रकारामध्ये आहे.

संगीतकार श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी गुजरातेतील बडोदा येथे झाला. संगीतातील करिअरच्या



त्यांच्या निवडीवर त्यांचा मोठा भाऊ काशिनाथ खळे यांचा प्रभाव होता. बडोद्यातल्या सयाजीराव गायकवाड संगीत महाविद्यालयात मधुसूदन जोशी यांच्याकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले. पुढे अता हुसेन खाँ, निसार हुसेन खाँ आणि फैयाज हुसेन खाँ यांच्यासारख्या दिग्गजांकडून त्यांना शास्त्रीय संगीताची तालीम मिळाली.

खळे यांनी प्रामुख्याने मराठी चित्रपट उद्योगासाठी संगीत दिले असले तरी, त्यांनी हिंदी, बंगाली, गुजराती आणि संस्कृत भाषांमध्येही संगीत दिले. त्यांनी १४१ कविता रेकॉर्ड केल्या आणि सहा मराठी चित्रपटांसाठी संगीत दिले.

१९५२ साली त्यांची 'गोरी गोरी पान' आणि 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख' दोन गाणी असलेली पहिली तबकडी प्रसिद्ध झाली. आशा भोसले यांची तिच्यातील ही गीते तेव्हा खूप लोकप्रिय झाली. या चिमण्यांनो परत फिरा रे, हे त्यांनी संगीतबद्ध केलेले गीत खूप प्रसिद्ध झाले. आकाशवाणी, मुंबई येथे असताना त्यांनी पाणीग्रहण, विदुषक आणि देवाचे पाय या नाट्य नाटकांना संगीतही दिले.

१९७२ मध्ये लतादिदींना 'अभंग तुक्याचे' ही कल्पना सुचली. खळेसाहेबांनी तुकारामांची गाथा घेतली व २५० रचना काढल्या. पण करायच्या होत्या दहाच. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी' पहिल्यापासून मनांत बसलेली. मग अप्पा म्हणजे गो. नी. दांडेकरांनी निवडल्या ११६ रचना. ते म्हणाले 'अरे, 'श्रावणांत घननीळा' हा शिरपेच, आतां याहून चांगलं काय?' परत दोनअडीच तास बसून कमी केल्या व २२ रचनांवर आले. यातून १०च रचना हव्यात म्हणून वसंत बापटांची व विद्याधर गोखल्यांची मदत मागितली. त्यांनी प्रत्येकी काढल्या २० आणि १७ रचना. यातून शेवटी कमी करत खळयांनीच २० अभंग घेऊन चाली लावल्या. त्यातील दहांची निघालेली रेकॉर्ड अजरामर झाली.

पुढे १९८४ साली श्रीनिवास खळयांनी 'राम-श्याम गुणगान' रचली. ही रचना पं. भीमसेन जोशी व लता मंगेशकर यांनी एकत्र गायली. १९९३ साली महाराष्ट्र सरकारने खळे यांना 'लता मंगेशकर' पुरस्कार देऊन गौरविले.

त्यांचा शेवटचा अल्बम नाथ माझा मी नाथांचा सप्टेंबर २००९ मध्ये प्रदर्शित झाला ज्यामध्ये संत कृष्णदासांचे अभंग आणि भक्तिगीते समाविष्ट आ-हेत. त्यांच्या शिष्यांमध्ये प्रसिद्ध संगीतकार आणि गायक शंकर महादेवन हे आहेत.

श्रीनिवास खळे यांचे २ सप्टेंबर २०११ रोजी निधन झाले.

# गणेशोत्सवात वीजेची समस्या

## •नागरिकांतून संतापाची लाट• छोटे-मोठे व्यावसायिक हैराण

**| माणगाव | प्रतिनिधी |**

**माणगाव तालुक्यातील निजामपूर शहरात गेल्या अनेक दिवसापासून सुरू असलेल्या वीज खंडित समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हिंदू धर्माचे आराध्य दैवत असणाऱ्या गणेशोत्सवाच्या काळात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचा संयम सुटू लागला असून संतापाची लाट उसळली आहे. निजामपूर विज वितरण कं. कार्यालयातील कनिष्ठ अभियंता सचिन गुळवे व निजामपूर शहरात असणाऱ्या वीज वितरण कंपनीचे कर्मचारी यांची तात्काळ बदली करा अशी मागणी निजामपुरातील नागरिकांकडून होत आहे.**



गेली सहा महिन्यापासून निजामपूर शहर व परिसरात सतत वीज पुरवठा खंडित होत आहे. निजामपूर वीज वितरण कंपनीचे कर्मचारी वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर नागरिक चौकशीसाठी फोन करतात मात्र ते फोन एमएससीबीचे कर्मचारी उचलत नाहीत. तसेच पावसाळ्याचे दिवस असल्याने या कार्यालयात विशेषता रात्रीच्या सुमारास कर्मचारी उपस्थित नसतात. निजामपूर वीज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता हे निजामपूर येथे मुख्यालयाच्या ठिकाणी न राहता ते माणगाव येथे वास्तव्य करतात. तसेच निजामपूर वीज कार्यालयातील काही कर्मचारी हंगामी म्हणून काम करतात त्यामुळे त्यांनाही काम करताना मर्यादा पडतात. त्यामुळे रात्री -अपरात्री वीज पुरवठा खंडित झाल्यास निजामपूर येथील कर्मचाऱ्यांना या समस्येला तोंड द्यावे लागते.

नागरिकांनी या कर्मचाऱ्याकडे चौकशी करण्यासाठी फोन केल्यानंतर त्यांच्या सोबत कार्यरत असलेले वायरमन देखील फोनवर प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे नागरिकांना समस्येची कारणे किंवा दुरुस्तीची माहिती वेळेवर मिळत नाही.

गुळवे हे निजामपूरमध्ये मुख्यालयाच्या ठिकाणी न राहता माणगाव येथे वास्तव्य करत असल्यामुळे, निजामपूर शहर व परिसरात विजेचा बिघाड झाल्यास दुरुस्तीसाठी तातडीने कार्यवाही होत नाही. त्याामुळे रात्रभर नागरिकांना अंधारात राहावे लागते. निजामपूर भागातील छोटे मोठे व्यावसायिक या विजेच्या लपंडावामुळे हैराण झाले आहेत.

### उपकरणाचे नुकसान

अनेक ग्राहकांच्या घरातील इन्वर्टर, टीव्ही, एलईडी बल्ब, ट्यूब, फ्रिज, तसेच विजेवर चालणारी उपकरणात बिघाड झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

---



अलिबाग जवळील चेंढरे-पाटीलवाडी येथिल सुवासिनीनी एकत्र येऊन गौरीचे मनोभावे पूजन केले .(छायाचित्र : समीर मालोदे)



■ पनवेलमध्ये अनेक कुटुंबात गौराईचा आगमन झाले, सोमवारी महिलावर्गांनी या गौराईची पूजा करण्यात आली. (छायाचित्रः राजेश डांगळे)

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची स्थापना

**| मुंबई | प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनावर बसलेली मूर्तीची प्रतिष्ठापना महाड तालुक्यातील वहूर या गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे आगमन होताच, पूजन करून रांगोळीसह मुले मुली, तरुण मंडळी ढोलताशा पथक, लेझीम अशी ही भव्य मिरवणूक काढून फटाक्याच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आली.



वहूर गावच्या इतिहासात खऱ्या अर्थाने नवा अध्याय लिहला गेला आहे वहूर गावच्या मध्यवर्ती चौकात मूर्ती स्थापना करण्यात आली, वहूरकरांची अनेक वर्षांची प्रतीक्षा पूर्ण झाल्याचे येथील नागरिकांनी व्यक्त केले.

या ऐतिहासिक क्षणामुळे वहूर गावच्या वैभवात मानाचा तुरा रोवला गेला, पुणे येथील शिल्पकार राम माळी यांनी मनमोहक मूर्ती साकारली.

यावेळी स्नेहल जगताप, नागेंद्र राठोड, चंद्रकांत धोंडगे, बंटी पोटफोडे, प्रफुल धोंडगे, धनंजय देशमुख, रिहान देशमुख, सुभाष मोरे, किशोर सरकले, मुदसिर पटेल, बाबू पटेल, नदीम इसाने, मोहम्मद शहीद कुणके, राजेंद्र कोरपे, किरीट पेंढारी, रमण आंबेकर, विजय खांबे, मन्सूर ताज यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली होती.

# नेरळमध्ये ५०० कुटुंबाचा एक गणपती

## • १४१ वर्षांची परंपरा असलेला पर्यावरणपूरक बाप्पा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मुंबईत गिरगावमध्ये राहणारे पोतदार कुटुंब नोकरीनिमित्त नेरळला आले आणि त्यांनी सुरू केलेला पोतदार कुटुंबाचा गणपती बाप्पा १४१ वर्षांचा झाला आहे. पहिल्या वर्षी बनवलेली गणेशमूर्ती आजही पोतदार कुटुंब शाडूच्या मातीपासून घडवतात. बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी साधारण ५०० कुटुंब नेरळला दर्शनासाठी येऊन जातात अशी या बाप्पाची महती आहे.



मुंबईच्या गिरगाव भागातून पोतदार कुटुंब वास्तव्यास आले. त्यांनी १८८४ साली आपल्या घरी प्रथम गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यावेळची गणेशमूर्ती आणि आजची मूर्तीसारखीच आहे. पोतदार कुटुंबीय पारंपरिक पद्धतीने गणेश उत्सव साजरा करतात. यंदा उत्सवाचे १४१ वे वर्ष आहे. देश पारतंत्र्यात असताना १८८१ साली कुटुंबातील ज्येष्ठ पणजोबांनी आजोबांच्या जन्मासाठी भाद्रपद महिन्यातील बाप्पाला नवस केला होता. त्यामुळे पोतदार कुटुंबातील दत्तात्रय पोतदार यांच्या आजोबांच्या जन्माच्या नवसाचा महगणपती म्हणून त्याची स्थापना केली होती. १०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल महागणपतीचा शतक महोत्सव साजरा करण्यात आला.

# हत्तींकडून भातशेतीचे नुकसान

**| दोडामार्ग | प्रतिनिधी |**

सोनावल येथील भातशेती पायदळी तुडवत हत्तींनी मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. यात शेतकरी शिवराम गवस यांचे नुकसान झाले आहे. हत्ती हाकलवण्यासाठी कार्यरत असणारे वनविभागाचे हाकारी मात्र अपयशी ठरल्याच्या उद्विग्न भावना शेतकऱ्यांमधून उपस्थित होत आहेत. तळकट पंचक्रोशीत वावरणारे हत्ती तिलारी खोऱ्यात दाखल झाले आहेत.



मागील काही दिवसांपासून या हत्तींनी येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले आहे. हे नुकसान सत्र सुरूच असून वनविभाग मात्र हत्तींना रोखण्यात अपयशी ठरल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. शनिवारी रात्री हत्तींचा कळप सोनावल भागात वावरत होता. सोनावल येथील शिवराम गवस यांच्या भातशेतीत हा कळप घुसला. संपूर्ण भात शेती हत्तींनी पायदळी तुडवली. यात शिवराम गवस यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# बगळ्या रोगांचा प्रादुर्भाव

**मोखाडा** : तालुक्यातील बदललेल्या वातावरणामुळे भातपिकावर बगळ्या व करपा रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. या रोगांनी पिके पोखरल्याचे चित्र समोर आल्यानंतर आता कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

जुलैच्या शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस झाल्यावर ऑगस्टच्या पहिल्या आठ दिवसांत मात्र पावसाने दडी मारली. तर १६ ऑगस्टपासून मात्र मोखाडा तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. या बदलत्याा वातावरणाचा परिणाम भातासह नाचणीच्या पिकावर होऊ लागला आहे. मोखाडा तालुक्यात भातपिकावर बगळ्या रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने पीक संकटात सापडले आहे.

# रेवदंड्यात ७० वर्षांची गणेश-गौरी

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा आगर आळीतील उदय कुंज येथे उदय मढवी कुटुंबाचा गणेशोत्सोव याच भावनेचे जिवंत उदाहरण ठरले आहे. सन १९५६ साली जगन्नाथ बाळा मढवी यांनी मुंबई-वसई येथून आणलेल्या श्री गणेश आणि लाकडी गौरी स्थापून सुरू केलेली ही परंपरा आज सात दशकांचा टप्पा पार करूनही अखंड भक्तिभावाने सुरू आहे. नव्या घरात पहिल्यांदाच गणेश



व गौराईंचे आगमन झाल्यापासून दरवर्षी पालखीतून श्रींची मिरवणूक गावकऱ्यांच्या उपस्थितीत काढली जाते. सार्वजनिक गणेशोत्सवा इतकाच उत्साह या घरगुती उत्सवातही अनुभवायला मिळतो. गौरी आगमनाच्या निमित्ताने घरात संपन्नता, ऐश्वर्य व मंगलतेचा वास फुलतो, ही भावना मढवी कुटुंब पिढ्यान्पिढ्या जपत आले आहे. स्त्रीशक्तीचे पूजन हा या उत्सवाचा आत्मा असून तिच्या कृपेने घरात ऐक्य, समाधान आणि समृद्धी लाभते, असा विश्वास आहे. दरवर्षीप्रमाणे याही वेळी गौरी मातेच्या समोर पारंपरिक गाणी, फुगड्या, नाच आणि जागरण होऊन उत्सव आनंदमय झाला.

## अठरा हजारहुन अधिकांनी घेतला लाभ | शस्त्रक्रियेसह विविध आजारांचा समावेश

# आयुष्यमान योजना ठरतेय वरदान

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला आरोग्य उपचार मोफत मिळावेत यासाठी केंद्र शासनाकडून आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची सुरूवात करण्यात आली.**

मागील सात वर्षांपासून कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील १८ हजारहुन अधिक गोरगरिबांनी या योजनेचा लाभ घेवून उपचार करून घेतले. त्यामुळे ही योजना आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या गोरगरीब रूग्णांची आधार बनली आहे. त्यामुळे या योजनेची आणखीन जनजागृती




होणे गरजेची असून जनजागृती झाल्यास गावे, खेड्यापाड्यातील, दुर्गम भागातील आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना या योजनेचा लाभ मिळेल. आयुष्मान भारत योजना ही भारत सरकारची आरोग्य योजना आहे. या योजनेअंतर्गत सरकार लोकांना आयुष्मान भारत गोल्डन कार्ड प्रदान करते.

या योजनेअंतर्गत कार्डद्वारे आर्थिकदृष्टया दुर्बल नागरिक रूग्णालयात जावून पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत मिळत आहे. ही योजना २०१८ सालापासून सुरूवात झाली. देशभरातून कोट्यवधी गरीब, गरजू रूग्णांनी या योजनेचा लाभ घेतला तर रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो, लाखो रूग्णांनी आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घेवून उपचार घेतले.पूर्वी उपचाराची मर्यादा होती, त्याचबरोबर विमाकवच कमी होते.

> **३१ ऑगस्टपर्यंत आयुष्यमान भारत योजनेतून कार्ड काढण्यासाठी विशेष मोहीम आहे. त्यामुळे गणेशोत्सवासाठी आलेल्या चाकरमान्यांनी आयुष्यमान गोल्डन कार्ड काढून घ्यावे. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी सर्वांनी आयुष्यमान कार्ड काढून घ्यावे.**
> **-डॉ. प्रवीण गुरूले, जिल्हा समन्वयक, आयुष्यमान भारत योजना.**

---

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ सप्टेंबर

१) श्रीम. शुभलक्ष्मी सुभाष वैद्य चेंढरे, अलिबाग, २-९-१९४४
२) श्रीम. अपर्णा अशोक म्हात्रे अलिबाग, २-९-१९४७
३) श्रीम.सुनंदा गोपीनाथ रूईकर श्रीबाग, अलिबाग, २-९-१९४७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### सुवर्णकण



आपली सर्व धडपड कधीही सांग न होणारा संसार सांग करण्यासाठी असते
अधिकारी साधक हा पूर्वसुकृत त्यामुळे जन्म घेतानाच सावध झालेला असतो
असा साधक जेव्हा संतांना जेव्हा शरण जातो तेव्हा वंचना न करता
संत त्या साधकाला बोध करतात.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

### अजगराला जीवदान

**सिंधुदुर्ग** : न्हावेली भोमवाडी येथील मानवी वस्तीत आलेल्या सुमारे सात फूट अजगराला सर्पमित्र गोविंद गवंडे यांनी नैसर्गिक अधिवासात सोडले. न्हावेली येथील जंगल परिसरातून भोमवाडीतील मानवी वस्तीतील शेतकरी हरमलकर यांच्या ओसरीला गावरान कोंबड्यांना आपला भक्ष बनवण्यासाठी आलेला अजगर ग्रामस्थांच्या दृष्टीत पडला. त्याला पकडण्यासाठी ग्रामस्थांनी मातोड पेंडूर येथील सर्पमित्र गोविंद गवंडे यांना बोलावले. सर्पमित्र गवंडे यांनी अजगराला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

### एमआयडीसीतील उद्योग ठप्प

**चिपळूण** : तालुक्यातील खडपोली नदीवरील पूल कोसळल्यामुळे संपूर्ण औद्योगिक वसाहतीकडे जाणारे दळणवळण ठप्प झाले आहे. खडपोली औद्योगिक वसाहतीतील अनेक उद्योगांना उत्पादन बंद ठेवण्याची वेळ आल्यामुळे शेकडो कामगार बेरोजगारीच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहेत. मुराद अडरेकर यांनी या पार्श्वभूमीवर प्रशासनाला जाब विचारला असून तत्काळ पर्यायी दळणवळण मार्ग अवजड वाहनांसाठी खुला करण्याची आग्रही मागणी केली आहे. जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व अधिकाऱ्यांनी तातडीने पूल पुनर्बांधणीसाठी कार्यवाही सुरू करावी. तोपर्यंत अवजड वाहतुकीसाठी ट्रेलर, कंटेनर, टँकर आदी सक्षम पर्यायी पूल उपलब्ध करून द्यावा. अन्यथा कारखानदार व कामगारांवर येणाऱ्या संकटाला प्रशासनच जबाबदार राहील.

### बंदी उठल्यानंतरही मासेमारी थंड

**रत्नागिरी** : मासेमारी बंदी संपल्यानंतर मच्छिमार नौकांच्या मासेमारीचे पहिले काही दिवस चांगले गेले. मात्र, त्यानंतर समुद्रातील वातावरण खवळलेले असल्याने अनेक नौका समुद्रात मासेमारीसाठी जावू शकलेल्या नाहीत. ज्या नौका समुद्रात मासेमारीसाठी गेल्या त्यांना पुरेशी मासळी न मिळाल्याने मासळीचे दर कडाडलेलेच होते. मासळी मार्केटमध्ये शुकशुकाट होता. पावसाळी मासेमारी बंदी १ ऑगस्ट रोजी संपल्यानंतर फिशिंगच्या नौका समुद्रात जाऊ लागल्या. त्यामुळे खवय्यांची मासळी मार्केटमध्ये फारच कमी गर्दी होती.

---

## निवडक

### रोह्यात आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**रोहा** : रोह्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टतर्फे रविवार (दि.३१) रोजी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही सामाजिक उपक्रमांना लोकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अर्पण रक्तपेढी मुलुंड शाखा अष्टमी यांच्या सहकार्यातुन आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. आरोग्य शिबिरामध्ये रोह्यातील कदम वेलनेस क्लिनिकच्या डॉ. कांचन कदम यांनी स्किन व हेयर संबंधित रुग्णांची मोफत चिकित्सा व समुपदेशन केले तर अष्टमी सेंटरच्या डॉ. भूमी शेट्टी यांनी रुग्णांचे मोफत तपासणी केली. उपक्रम यशस्वी होण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष अमेय जोशी, चंद्रकांत पार्टे, निखिल दाते, हर्षद भाटे, भारत वाकचौरे, चैतन्य आठवले, सुमित रिसबुड, शिवराज भांड, नागेश पाटणकर, सोहम बारटके, रविराज मेहेंदळे, चैतन्य भावे आदींसह सर्व कमिटी सदस्यांनी विशेष मेहेनत घेतली.





### सोनपावलांनी आली गौराई

**सिंधुदुर्ग** : लाडक्या गणपतीचे आगमन झाल्यानंतर रविवारी सोनपावलांनी गौरीचे सिंधुदुर्ग जिल्ह्यात घरोघरी आगमन झाले. सोमवारी गौरीचे पूजन होणार असून मंगळवारी गौरीचे विर्सजन होईल. गौरी आगमनावेळी महिला वर्गाचा अमाप उत्साह दिसून आला. गौराईच्या आगमनामुळे घराघरांत आनंदाचे वातावरण होते. माहेरवाशीण असलेल्या गौराई अनेक घरांमध्ये बसविल्या जातात. काही घरांमध्ये नवसाच्या तर काहीजण हौस म्हणून गौराई बसवतात. पारंपरिक पद्धतीने आघाडा, तिरडा, सोंतळ या वनस्पती घेऊन विहिरी, नदीकिनारी जाऊन या वनस्पतींची विधिवत पूजा करून गौराई आणली जाते. गौरीच्या पूजेची पद्धत आणि परंपरा वेगळ्या आहेत. काही कुटुंबात गौरीचे मुखवटे असतात. तर काही कुटुंबात परंपरेनुसार पाणवठ्यावर जाऊन पाच, सात किंवा अकरा खडे आणून त्यांची पूजा करतात. काही ठिकाणी पाच मडक्यांच्या उतरंडी करून त्यावर गौरीचे मुखवटे लावून त्या उतरंडीनाच साडी चोळी नेसवतात आणि त्यांची पूजा करतात. धान्याची रास म्हणजेच गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, डाळ आदींपैकी एक दोन धान्याचे ढीग करून त्यांची पूजा केली जाते.

### आरोग्य सुविधांसाठीही स्थलांतर

**पालघर** : पालघर जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागात आजही पोटाची खळगी भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असल्याचे चित्र आहे मात्र आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी जिल्हा असावा अशी घोषणा करत २०१४ साली ठाणे जिल्हा विभाजन करून पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यामुळे आता तरी सरकारी यंत्रणा आमच्या दारापर्यंत पोहोचून आमचा विकास करेल आमचे जगणं सुखकर होईल अशी अपेक्षा येथील आदिवासी तसेच गोरगरीब नागरिकांना वाटत होती, मात्र पोटापाण्यासाठीचे स्थलांतर तर आहेच त्यावर उपाययोजना सोडाच मात्र आता आरोग्य सुविधा मिळवण्यासाठी सुद्धा या भागातील शेकडो रुग्णांना जिल्ह्यातून स्थलांतर करावे लागत आहे. ही मोठी शोकांतिका आहे. पालघर जिल्ह्यामध्ये आजही मोठ्या आजारांवरील उपचारासाठी एकही सुसज्ज रुग्णालय नाही. याशिवाय मोठ्या आजारांबरोबरच जिकरीची प्रसुती यासाठी सुद्धा यंत्रणा नसल्याने अनेकदा जव्हार, मोखाडा, विक्रमगड या भागातील नागरिकांना नाशिक रुग्णालयाचा सहारा घ्यावा लागत आहे.



### प्लास्टिकच्या भस्मासुराचा विळखा

**ठाणे** : राज्यात प्लास्टिक बंदीचा कायदा लागू होऊनही, ङ्गसिंगल-यूजफ अर्थात एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर केवळ सुरूच नाही, तर तो धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. शहरीकरण, वाढती लोकसंख्या आणि ऑनलाईन शॉपिंगच्या नव्या सवयींमुळे प्लास्टिक पॅकेजिंगची मागणी प्रचंड वाढली आहे. कागदावर बंदी असली, तरी रस्त्यांपासून ते नदी-नाल्यांपर्यंत सर्वत्र प्लास्टिकचा कचरा साचलेला दिसतो, जो राज्याला एका मोठ्या पर्यावरणीय संकटाच्या तोंडावर उभे करत आहे. नेचर जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार, जागतिक प्लास्टिक प्रदूषणात भारताचा वाटा तब्बल २० टक्के आहे. ही आकडेवारी राज्याच्या आणि देशाच्या भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे. जगात दरवर्षी ४३० दशलक्ष मेट्रिक टनपेक्षा जास्त प्लास्टिकचे उत्पादन होते. एकूण प्लास्टिक कचऱ्यापैकी ४६ टक्के कचरा लँडफिलमध्ये टाकला जातो, तर २२ टक्के कचरा चुकीच्या पद्धतीने व्यवस्थापित होऊन पर्यावरणात मिसळतो.

### 'बाल्या नाच' संस्कृती आजही टिकून

**ठाणे** : कोकणची ओळख असलेले हे जाखडी नृत्य विशेषत: रतागिरी जिल्ह्यात पहायला मिळते गणेशोत्सवात कोकणातल्या वाड्या वस्त्यांवर जाखडीच्या डबलबारीचे कार्यक्रम रंगतात. मात्र हा प्रकार फक्त सणासुदीचे काळात पाहावयास मिळत असून शासनाच्या सांस्कृतिक विभागाने या पारंपरिक नृत्याला पारंपरिक पद्धतीला अनुदानाचा हातभार लावत ही कला जोपासण्यासाठी योजना आखणे गरजेचे बनले आहे. कोकणच्या जाखडी नृत्याला एक वैशिष्टपूर्ण असा ठेका आहे. जाखडीला साथ देणारे, गण गवळण गाणारे मध्यभागी एकत्र बसतात आणि वैशिष्टपूर्ण रंगीबेरंगी कपडे घालत जाखडी नृत करणारे त्याांच्या भोवती फेर धरून नाचतात. ढोलकीवर थाप पडताच नृत्याच्या पहिल्या कलावंताची एंट्री होते. दोन वाट्यांवर पाय ठेवून आणि डोक्यावर पेटता दिवा ठेवत हा कलावंत सलामी देतो आणि मग याच जाखडीच्या ठेक्यावर हे जाखडी कलावंत. आकर्षक मानवी मनोऱ्याच्या सहाय्यानं विविध पक्षी-प्राण्यांचे आकार घेत आपला कलाविष्कार सादर करतात. यानंतर सुरू होते ती गण आणि गवळण. पायाच्या आणि हाताच्या वैशिष्ट्यपूर्ण हालचाली आणि एकमेकांमधील ताळमेळ जाखडीला अधिक आकर्षक बनवतात. कोकणच्या ग्रामीण भागात जाखडी नृत्याची परंपरा जपणारी घराणी आहेत. त्यांचेही नियम आणि मान ठरलेले आहेत. काळाच्या ओघात कोकणचा हा सांस्कृतीक ठेवा मागे पडत आहे.

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



● आदेश ठाकूर यांच्या निवासस्थानी श्रीगणेशाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते प्रतिक खारकर



● नागाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुरेंद्र नागलेकर यांचे इथली गणरायाची प्रसन्न मूर्ती. (छायाचित्र - सुरेश खडपे)



● मंगेश नारायण पाटील, व नात प्रियल मंदार पाटील, सहाण, अलिबाग यांचे निवासस्थानी विराजमान झालेले गणराय



● खोपटे येथील ल.ध. म्हात्रे व धनेश्वर म्हात्रे यांच्या घरगुती गणपती बाप्पाची आकर्षक आरास. (छाया - काव्य म्हात्रे)



● स्वप्नील सुहास पाटील, मोठे शहापूर अलिबाग यांचा घरी विराजमान झालेले बाप्पा




● अनिकेत अनंत म्हात्रे वरंडेफाटा यांनी लालबागच्या राजाची प्रतिकृती सादर केली. (छाया - सुरेश खडपे)



● मोहन कृष्णा पाटील (दही हंडी डेकोरेशन) मु. सागाव मारूती



● चिरनेर येथील ह.बा. ठाकूर यांच्या निवासस्थानी साकारलेला कैलास पर्वताचा देखावा. (मूर्तीकार - नरेश हातनोलकर)



● श्री. वसंत रामचंद्र नाईक आणि परिवार खंडाळे यांच्या घरी विराजमान श्री गणेश आणि गौरी. (छायाचित्र - विक्रम नाईक)



● श्री. अमोल अनंत घरत, चौलमळा यांनी पंढरपूर विठ्ठलवारी देखावा सादर केलाय (छायाचित्र - सुरेख खडपे)



● श्री संदेश लक्ष्मण नाईक, बागमळा यांनी श्रीगणेशाची केलेली नयनरम्य सजावट. (छायाचित्र - सुरेश खडपे)



● श्री विनोद हरिश्चंद्र शेवडे नागाव नवापाडा यांनी केलेली श्रीगणेशाची प्रसन्न सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. प्रफुल्ल वार्डे, नागाव हटाळे यांचे इथली श्री गणरायाची सुबक मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● योगेश, प्रथमेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा यांच्या घरात साकारलेली दगडीचाळीतील बाप्पाची सुबक मूर्ती



● मुरूड तालुका पंचायत समितीचे माजी सभापती चंद्रकांत कमाने यांच्या मजगाव येथील निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाला वंदन करताना. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● अलिबाग मधील सुप्रसिद्ध वकील ॲड.डी.के.पाटील ढवर येथील निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाला वंदन करताना. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● श्री. सुरज भगत (बामणगाव) यांच्या निवासस्थानी श्रीगणेशाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते, श्री. प्रतिक भालचंद्र खारकर



● श्री. प्रभाकर म्हात्रे मु. भागीर्थीखार-रोहा यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशमूर्ती (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव)



● श्री विलास म्हात्रे शेडसई माजी ग्रामपंचायत सदस्य मु. भागीर्थीखार-रोहा यांच्या घरातील गणेशमूर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव)



● माणगाव तालुक्यातील विहुले गावचे रहिवाशी संतोष नथुराम शिंदे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सिद्धी दाखिणकर)

# निवडक

## वृद्धाचे सोने घेऊन तोतया पोलीस पसार

**पनवेल :** पोलीस असल्याची बतावणी करीत त्यांचे सात तोळे सोन्याचे दागिने घेऊन पसार झाल्याची घटना घडली. शिरीष माने असे फसवणूक करण्यात आलेल्या वृद्धाचे नाव आहे. माने हे आठ दिवसांपूर्वी गोदरेज सिटी, ठोंबरेवाडी, पनवेल येथे त्यांच्या मुलीकडे राहण्यास आले होते. पहाटेच्या वेळी ते गोदरेज सिटीपासून ठोंबरेवाडी रस्त्यावर मॉर्निंग वॉक करत असताना दुचाकीवरून दोन अज्ञात व्यक्ती आल्या व त्यांनी ते सीआयडी पोलीस असून, दोन दिवसांपूर्वी प्रकाश पाटील यांना गांजा विक्री करताना पकडले आहे, म्हणून या भागात आम्ही तपासणी सुरू केली असल्याचे त्यांना सांगितले. तसेच तुम्ही तुमच्या अंगावरील दागिने काढून खिशात ठेवा, असे सांगून त्यांनी माने यांना आपले ओळखपत्र दाखवले. त्यावर माने यांनी सोन्याची चेन, कडे आणि अंगठी काढून त्यांच्या टी-शर्टच्या खिशात ठेवली असता त्या चोरांनी दुचाकीवरून पलायन केले.



## लोकशाहीचा जागर कार्यक्रम संपन्न

**पनवेल :** सुदाम पाटील जिल्हाध्यक्ष काँग्रेस पक्ष व सचिव महाविकास आघाडी यांच्या वतीने काँग्रेस भवन पनवेल येथे लोकशाहीचा जागर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी विश्वास उटगी (अर्थशास्त्र विभाग) अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपस्थित होते. लोकशाहीची मूल्य जपणे, बेरोजगारी, मतदान चोरी या सर्व विषयात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. काँग्रेस भवन येथील कार्यक्रमात माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना उपनेते बबन पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, नरेंद्र गायकवाड, अरविंद सोनटक्के, निरीक्षक चंद्रकला नायडू, शिवसेना शहरप्रमुख प्रवीण जाधव, शशिकला सिंह जिल्हा कार्याध्यक्ष के.एस. पाटील, शशिकांत बांदोडकर, शंकर म्हात्रे, सुरेश पाटील, निर्मला म्हात्रे, नौफील सय्याद, लतीफ शेख, विजय चव्हाण, प्रकाश म्हात्रे, देवेन्द्र मढ़वी, ललिता सोनवणे, शबाना राजापकर, हेमराज म्हात्रे, शैलेश पाटणे, सुदेशना रायते, जयश्री खटकले, कलावती माळी, शाहीद मुल्ला, ताहिर खामकर, जोस जेम्स यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



## गोवे येथे रंगला नाचाचा जंगी सामना

**कोलाड :** कोलाड गोवे येथील कै.अर्जुन पवार परिवार गणपती उत्सवाला ७५ वर्ष होत असल्याने या अमृत महोत्सव निमित्ताने रविवारी दि.३१ ऑगस्ट रोजी गोवे येथे रात्री साडे आठ ते ११ वाजेपर्यंत महिला नाचाचा शक्ति-तुरा सामना आयोजित करण्यात आला होता. तरी या कार्यक्रमास बहुसंख्यक नागरिकांनी उपस्थिती लाभली. कै.अर्जुन पवार परिवार गणपती उत्सवाला या वर्षी ७५ वर्ष होत असल्याने पवार परिवारांच्या वतीने गणपती उत्सवात सतत ७ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पहिल्या दिवशी श्री शिव शंभु मंडल गोवे भजन, दुसऱ्या दिवशी श्री दत्त कृपा प्रासादिक मंडळ चोले भजन, तिसऱ्या दिवशी आनंदी माता मंडळ भजन ढोकले वाडी,चौथ्या दिवशी शिरीष अंनप्लग भजन पाले खुर्द, पाचव्या दिवशी श्री गावदेवी नाच मंडळ मुडानी गायिका दर्शना मलेकर, कवी चंद्रकांत थोरवे, तुरेवाले शाहिर बापदेव नाच मंडळ बोरणवाडी गायिका संगीता नाईक यांच्या गैरहजेरीत युवती जांभेकर, कवी प्रभाकर ओव्हाळ यांचा महिला नाचाचा जंगी सामना रंगला.



## प्रगतीमापन अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन

**रायगड :** जिल्हा सांख्यिकी कार्यालयाची निर्मिती असलेल्या जिल्ह्याचे शाश्वत विकास ध्येये, जिल्हा निर्देशक आराखडा प्रगतीमापन अहवाल सन २०१५-१६ ते सन २०२२-२३ पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी तसेच सांख्यिकी कार्यालयाच्या उपसंचालक वृषाली माकर उपस्थित होत्या.



## पराग वडके यांना मारण्याची धमकी

**महाड :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहर अध्यक्ष पराग वडके यांना अज्ञात इसमाने जीवे मारण्याची धमकी पत्राद्वारे दिल्यामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी शहर पक्षाचे शहर अध्यक्ष शहरातील विविध समस्यांवर आक्रमक पवित्रा घेत असताना दिसत आहेत. प्रामुख्याने यामध्ये शहराला भेडसावत असणाऱ्या पूरपरिस्थितीवर काढण्यात येणाऱ्या रेजग्या विरोधात प्रशासनावर आक्रमकपणे बरसले होते. नुकतेच गणपतीच्या तोंडावर शहरातील खड्ड्यात बेसुमार रेती खडी टाकून शहराला बकाल करण्याच्या विरोधात खड्ड्यात पोहण्याच्या अद्‌भुत स्पर्धा भरवून साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले होते. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात पाळलेले मांजर मृत्यू पडलेले प्रशासनाला भेट देऊन जनतेप्रतीच नाही तर निसर्गाप्रती आपली बांधिलकी जपून सत्ताधाऱ्यांना डिवचले. याचाच त्रास सहन न होऊन अज्ञात इसमाने पत्राद्वारे पराग वडके यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे समजते.

# शिक्षकांचा ‘आधार’ चा ताप कमी?

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्याचे, तपशील अद्ययावत करून घेण्याचे शिक्षकांचे काम कमी होण्याची आहे. आधार प्राधिकरणाने केंद्रीय शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या सहकार्याने यूडायस प्लस प्रणालीमध्ये सुविधा विकसित करून दिली असून, त्याद्वारे आधार अद्ययावत नसलेल्या विद्यार्थ्यांचा तपशील उपलब्ध होणार आहे. तसेच आधार अद्ययावतीकरण प्रलंबित असलेल्या देशभरात १७ कोटी विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्येच आधार शिबिर आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**



आधार प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश कुमार यांनी या बाबत राज्यांच्या मुख्य सचिव पत्राद्वारे अनिवार्य बायोमेट्रिक अद्ययावतीकरण प्रक्रियेसाठी सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात शालेय शिक्षण विभागाने आधार कार्डवर आधारित संचमान्यता लागू केली आहे. त्यामुळे राज्यभरातील शाळांमध्ये शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या वैध आधार कार्डसाठी प्रयत्न करण्यात येतात. मात्र, काही विद्यार्थ्यांकडे आधार कार्डसाठी आवश्यक कागदपत्रे नसणे, कागदपत्रांमध्ये तांत्रिक चुका असणे अशा प्रकारांमुळे वैध आधार कार्ड तयार करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. राज्यातील सुमारे ४.५ टक्के विद्यार्थी विविध तांत्रिक कारणांनी आधार अवैध

### ● शाळांमध्ये करणार शिबिरांचे आयोजन

ठरल्याचे शिक्षण विभागाच्या संचमान्यता संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार दिसून येत आहे.

भुवनेश कुमार यांनी राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात शाळांमध्ये आधार अद्ययावतीकरणासाठी शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. ५ ते १५ या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आधार कार्डमध्ये बायोमॅट्रिक तपशील समाविष्ट करणं आवश्यक आहे. ते न केल्यास शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात, योजनांसाठीच्या प्रमाणीकरणात, नीट, जेईई, सीयूईटी अशा परीक्षांच्या नोंदणीत अडचणी येऊ शकतात.

> “शाळांमध्ये आधार अद्ययावतीकरणासाठी शिबिरे आयोजित करणे हा अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. कारण यापूर्वी तालुकास्तरावर अशी यंत्रणा उपलब्ध करून देण्याच्या घोषणा झाल्या. मात्र, त्याचा फारसा उपयोग झाला नाही. जुन्या मोबाइल क्रमांकावर ओटीपी जाणे, जन्म दाखल्याबाबत अडचणी आणि अन्य तांत्रिक बाबीसाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. जेणेकरून संबंधित विद्यार्थी आधार वैध होतील. तसेच त्यांना त्या प्रमाणात त्यांना शिक्षक उपलब्ध होऊन शिक्षण व्यवस्था सक्षम होईल. शाळांमध्येच आधार कार्डसाठी शिबिरे आयोजित केल्यास शिक्षकांचे काम कमी होईल.”
> -महेंद्र गणपुले, माजी मुख्याध्यापक

## इसम बेपत्ता

**पनवेल :** आजोबांना चहा देवुन येतो असे सांगुन ६१ वर्षीय एक इसम राहते घरातुन निघुन गेले आहेत व मिळुन येत नाहीत. म्हणुन पनवेल शहर पोलीस ठाण्यात ते हरविल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. अजीज ईब्राहीम तांबोळी वय ६१ वर्षे ( मरियम अपार्टमेंट, रूम नंबर ३०१, पनवेल) अंगाने सडपातळ, उंची ५ फुट ३ इंच, चेहरा-उभट, रंग-सावळा, डोक्याला पुढील बाजुस अर्धवट टक्कल पडलेले, डोळे काळे, नाक-सरळ, दाढी मिशीचे केस काळे पांढरे, अंगात नेसुन-गुलाबी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट, भाषा हिंदी, मराठी बोलणारे आहेत. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा विनय तळभंडारे यांच्याशी संपर्क साधावा.

## एकाच रात्री ५ दुकाने फोडली

**पनवेल :** एकाच रात्री खारघर वसाहतीमध्ये ५ दुकाने फोडल्याने परिसरात भीतीयुक्त वातावरण आहे. खारघर वसाहतीमध्ये राज टॉवर येथे असलेल्या ग्लोबल सिरॅमिक, रामदेव स्वीट अँड फरसाण मार्ट, देवराज प्लायवूड, मेडिकल स्टोर व डेंटल क्लिनिकचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून लाखो रुपये किमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम लंपास केली असून सदर चोरीचा प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. यामुळे सणासुदीच्या काळात व्यापाऱ्यांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे.

## अजगराला जीवदान

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा हद्दीत आढळून आलेल्या एका अजगराला सर्पमित्रांच्या मदतीने पकडून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.



चिरनेर कातळपाडा येथील राजेंद्र वशेणीकर व मधुकर गोंधळी यांच्या घरांमध्ये असलेल्या नाल्यात दहा ते बारा फूट लांबीच्या अजगराचा वावर असल्याचे येथील नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

प्रसंगावधान राखत येथील नागरिकांनी सर्पमित्र जयवंत ठाकूर यांच्याशी संपर्क साधून, त्यांना अजगराचा वावर असल्याची माहिती दिली. सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी काळजीपूर्वक या अजगराला पकडून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

## रक्तदान शिबिरात ४६ बाटल्या संकलन



**। महाड । प्रतिनिधी ।**

गेल्या काही वर्षे पासून महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत आजही विक्रम महिलांनी केले आहेत रक्तदान हे जीवनातील महत्वाचे दान असल्याने महिला वर्गाने रक्तदान जास्त प्रमाणात करावे असे मत रक्तदात्या अर्चिता मुळे यांनी महा रक्तदान शिबिराप्रसंगी व्यक्त केले.

रक्ताची निकड लक्षात घेता मंडळ तर्फे रक्तदान शिबिर दरम्यान ४६ रक्तदात्यानी रक्तदान करत कार्यक्रमाची शोभा वाढवली यावेळी महिला वर्गाने मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

काकासाहेब चितळे स्मृति केंद्र संचलित, जनकल्याण रक्तकेंद्र महाडचे डॉ चिन्मय शहा यांच्या मार्गदर्शनाखाली भ्रांती खोपकर, रविकांत शिंदे, सरस्वती पाटोळे, नमिरा चरफळे, नीलिमा कदम, चालक रामचंद्र उडरे यांच्या उपस्थित जवळपास ४६ बाटल्या रक्त संकलन करण्यात आले.या वेळी महिलांनी सुद्धा रक्तदान करत आपला सहभाग नोंदविला. रक्तदान करणाऱ्या या महिलांमध्ये प्रियांका बागडे, मनश्री पोरे, अक्षया हेलेकर, साईरा बुटाला, सुकन्या बुटाला, सुप्रिया पोरे, अर्चिता मूळे यांनी रक्तदान करत सहभाग नोंदविला.यावेळी मंडळाचे अध्यक्ष सुयोग पोरे, महिला मंडळ अध्यक्ष अक्षया हेलेकर आदी उपस्थित होते.

## पेशवाई रस्त्याच्या मजबुतीकरणाची प्रतीक्षा

**। नेरळ। प्रतिनिधी ।**

नेरळ गावाला वळसा घालून जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने नेरळ गावात वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. त्यामुळे नेरळ गावाच्या बाहेरून जाणाऱ्या पेशवाई रस्त्याचे बांधकाम करण्यात यावे अशी मागणी सातत्याने होत आहे. आंबिवली फाटक ते बोरले या पेशवाई रस्त्याचे मजबुतीकरण केल्यास पर्यायी रस्ता निर्माण होईल आणि नेरळ गावातील वाहनाची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे.



राज्यात पेशवाई असताना बाजीराव पेशवे यांच्या काळात निर्माण झालेल्या रस्त्याला पेशवे रस्ता म्हणून ओळखले जाते. दामत फाटक पासून आंबिवली फाटक पर्यंत रस्ता पेशवाई रस्ता असे नाव पडले. मात्र देशातून पेशवाई गेली तसे हा रस्ताही नामशेष होतो की काय? अशी स्थिती येथील बांधकाम विभाग आणि येथील राज्यकर्त्यांनी करून ठेवली आहे. शासनाने बोरले ते आंबिवली फाटक हा रस्ता शासनाने सिमेंट कॉंक्रिटचा बनविला तर नेरळ गावातील नेहमीची वाहतूक कोंडी कायमची दूर होईल. शासनाचे प्रतिनिधी पेशवाई रस्त्यासाठी २० कोटी, ४० कोटींची निधी मंजूर केले आहेत अशा चर्चा गेली पाच दहा वर्षे सुरू आहेत. मात्र पेशवाई रस्त्यासाठी आजपर्यंत एकही रुपयांचा निधी प्राप्त झालेला नाही.

## काशिबाई शिंदे यांचे निधन

**खांब :** लांढर गावच्या रहिवाशी असणाऱ्या काशिबाई नारायण शिंदे यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी ४ सप्टेंबर रोजी भवानी मंदिर लांढर येथे तर अंतिम धार्मिकविधी ७ सप्टेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.



## विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर पनवेल या विषयावर खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा

**। पनवेल। वार्ताहर।**

गणेश कोळी संपादित ‘पनवेल टाइम्स’च्या वर्धापन दिनानिमित्त ‘‘विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर : पनवेल’’ या विषयावर खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा जाहीर करण्यात आली असल्याचे माहिती आयोजकांनी दिली आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निबंध स्वलिखित स्वरूपात पीडीएफ फॉरमॅटमध्ये. या मेलवर अथवा ९३२२३३९७९७ या व्हॉट्सॲप नंबरवर पाठविता येईल. निबंधाची शब्दमर्यादा १५०० शब्द इतकी ठेवण्यात आली आहे, असे आयोजकांनी कळविले आहे.

विजेत्यांना पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिन सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात येतील, असे आयोजकांनी कळविले आहे

प्रथम पारितोषिक रु ३००१, द्वितीय पारितोषिक रु २००१ तर तृतीय पारितोषिक रु १००१ असे ठेवण्यात आले आहे. निबंध पाठविण्याची अंतिम तारीख १० सप्टेंबर २०२५ असून परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील, असे आयोजकांनी कळविले आहे.

अधिक माहितीसाठी ९३२२३३९७९७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे संपादक गणेश कोळी यांनी कळवले आहे.

## विघवलीत पकडला अजगर

**माणगाव :** माणगाव जवळील विघवली गावातील ग्रामस्थ अनंत साठे यांच्या घरा मागील परिसरात रात्री एकच्या सुमारास मोठा अजगर आढळून आला. त्यांनी ताबडतोब निलकंठ साठे, सरपंच वैष्णव साठे आणि गावातील इतर जाणकार मंडळी यांना बोलावले. नीलकंठ आणि वैष्णव यांनी ताबडतोब सर्पमित्र अविनाश वाघे यांना बोलावण्यात आले. अविनाश यांच्या अथक प्रयत्नाने अजगराला पकडण्यात यश आले. अविनाश याने त्याचे सर्पमित्र प्रशांत सुतार यांच्या मदतीने जंगलात सोडून अजगराचे प्राण वाचविले.

## सिग्नलचा पर्याय अवलंबण्याची स्थानिकांची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात येणारे पर्यटक यांच्यामुळे दर शनिवार रविवारी कर्जत चारफाटा येथे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. कर्जत शहरातून दहिवली कडे जाणाऱ्या श्रीराम पुलावर दररोज वाहतूक कोंडी होत असून या वाहतूक समस्या सोडवण्यासाठी सिग्नल यंत्रणेचा पर्याय प्रशासनाने निवडावा अशी मागणी स्थानिक करीत आहेत.



कर्जत चार फाट्यावर शनिवार व रविवार जास्त प्रमाणात ट्रॅफिक होते.त्यात बेशिस्त वाहन चालक यांच्याकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. एकेरी लाईन मध्ये कधी शिस्तीत उभे राहत नाही आणि त्यात भर म्हणजे वाहतूक कर्मचारी यांची कमतरता वाहतूक कोंडीसाठी नित्याची बनली आहे. कर्जत नगरपालिका वाहतूक कोंडी साठी स्वतःहून पुढाकार घेत नाही आणि पोलिसांनी कर्जत मधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी होमगार्ड यांची मदत घेणे गरजेचे बनले आहे. कर्जत पळसदरी फाटा भिसेगाव खिंड या ठिकाणी होमगार्ड किंवा वाहतूक अधिकारी शंभर टक्के नेमणूक गरजेची आहे. तेथे वाहतूक कोंडी होण्याचे कारण हे या भागात मोठ्या प्रमाणात काही फेरीवाले फळ विक्रेते यांच्या बाजूला अति उत्साही काही नागरिक गाड्या बेशिस्तपणे पार्किंग करतात. याचा फटका सर्वसामान्य कर्जत तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला बसत आहे.शनिवारी अधिकारी व कर्मचारी यांनी नियोजन केले तर काही प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होऊ शकते परंतु कृषी उत्पन्न समितीचे कर्मचारी कुठल्याही प्रकारचं आपल्या कर्मचाऱ्यांना नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

श्रीराम पूल आणि चारफाटा येथे वाहतूक कोंडी वर मात करण्यासाठी तेथे सिग्कनल यंत्रणा कार्यान्वित करावी अशी मागणी कर्जत शहर बचाव समितीने अनेकदा सिग्नलची मागणी केली आहे.कर्जत अमराई येथील ब्रिजचे काम अपूर्ण असल्या कारणाने तिथेही ट्रॅफिकची समस्या आहे.तसेच येणाऱ्या काळात वाहतूक कोंडी थांबवायचे असेल तर उड्डाण पूल बांधण्याची गरज वाढलेली वाहने यामुळे निर्माण झाली आहे. अधिकारी वर्गाच्या नियोजन शून्य कारभार आहे म्हणून ही परिस्थिती आज सामान्य कर्जतकरांना भोगावी लागत आहे. कर्जत चार फाटा आणि दहिवली छत्रपती संभाजी राजांच्या पुतळ्या जवळ सिग्नल यंत्रणा बसवावी. चार फाटा ते राज कॉटेज आणि श्रीराम पूल ते यशदा हॉल, या रस्त्यावर डिव्हायडर टाकावे बसवले आहेत. मात्र त्यामुळे रस्ता आणखी अरुंद बनला असल्याने सिग्नल यंत्रणेचा पर्याय अवलंबण्याची मागणी होत आहे.

### जिल्हाधिकारी किशन जावळे प्रतिपादन | सेवाविषयक बाबींचा पूर्तता मेळावा संपन्न

## कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**आपल्याला कर्मयोगी व्हायचे असल्यास सतत शिकत राहणे आवश्यक आहे. कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य आहे. शासकीय कामकाजातील नोटिंग, टिप्पणी, फायलिंग यांसारख्या मूलभूत बाबी प्रत्येक कर्मचाऱ्याने आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.**



मुख्यमंत्र्यांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सेवाविषयक बाबींच्या पुर्तता मेळाव्याचे आयोजन जिल्हा नियोजन भवन येथे करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, नगर पालिका प्रशासन अधिकारी विराज लबडे, सह-जिल्हा निबंधक श्रीकांत सोनवणे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, अनुकंपा भरतीसंदर्भात शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत जुने ४५ जीआर रद्द करून नवे धोरण लागू केले असून, त्या धोरणानुसार जिल्ह्यातील ग्राम विकास, नगरविकास, पोलीस तसेच इतर सर्व शासकीय विभागांतील प्रलंबित उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त उमेदवारांनी जनसेवेची ही संधी मनापासून आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्षमतेने पार पाडावी. तसेच काही कर्मचाऱ्यांना कालबाह्यबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आला असून, सर्व विभागांनी हा लाभ जानेवारी महिन्यात देण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील १ हजार ३९० कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके डिजिटायझेशन झाली असून त्यांना सेवार्थ क्रमांक जोडण्याची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले. कोतवाल आणि पोलीस पाटील या संवर्गातील प्रलंबित भरती प्रक्रियेत अडचणी दूर होऊन आता नियुक्ती सुलभ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. सर्व विभागांनी वर्षातून किमान दोन वेळा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या विषयांचे प्रशिक्षण द्यावे, असे निर्देश दिले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले.



● श्री. यशवंत शिंदे, शे.का.प. कार्यकर्ते मु. महादेवखार-रोहा यांच्या निवासस्थानी किल्ल्याच्या देखाव्यात विराजमान गणेशमूर्ती.



● श्री राज जोशी मु. महादेवखार- रोहा यांच्या घरातील गौरी गणपतीची लोभस मूर्ती. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव)



● सुभाष भगवान पारखे यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावट करून स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)



● ऋतुजा खारकर (बामणगाव) यांच्या निवासस्थानी श्री गणेशाचे दर्शन.



● माणगाव येथील पितांबर लालजी मेथा व परिवार यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र - सलीम शेख)



● माणगाव सुतारआळी येथील संदीप आनंदराम मेथा यांच्या निवासस्थानी ऑपरेशन सिंदुर आकर्षक सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र - सलीम शेख)



● मुरूड कोळीवाडा येथील जितेंद्र मकू यांच्या निवासस्थानी छावा चित्रपटातील एक प्रसंग देखावा आणि सुबक गणेशमूर्ती. (छायाचित्र - सुधीर नाझरे)



● पारस तुषार पाटील चौकीचा पाडा, अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा, जंगल वाचवा पर्यावरण रक्षण देखावा. (छायाचित्र - जीवन पाटील)



● रायगड भूषण पत्रकार श्री जीवन दत्तात्रेय पाटील, भाकरवड यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा



● महाजने येथील सतीश पारंगे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली गणरायाची मूर्ती.



● मुरूड-डोंगरी येथील अजिंक्य शेळके यांच्या आईचे घर निवासस्थानी गणेशमूर्ती. (छायाचित्र : सुधीर नाझरे)



● हरीश सुनील कदम (शेकाप युवा कार्यकर्ते) मु. बांधण, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा.

### चेंगराचेंगरीतील बळींच्या स्मरणार्थ

# आरसीबी स्मारक बांधणार



**। बंगळुरू । वृत्तसंस्था ।**

**विजय समारंभात झालेल्या चेंगराचेंगरीत जीव गमावलेल्या चाहत्यांच्या स्मरणार्थ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू एक स्मारक बांधणार आहे. जिथे आरसीबीच्या सर्वात उत्साही चाहत्यांची नावे, कथा आणि त्यांच्याशी संबंधित गोष्टी जतन केल्या जातील. सोमवारी फ्रँचायझीने त्यांच्या ६ कलमी जाहीरनाम्यात ही घोषणा केली. आरसीबी केअर्स नावाच्या या उपक्रमात म्हटले आहे की, फ्रँचायझी आता केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित राहणार नाही, तर पीडित कुटुंबे आणि चाहत्यांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी ठोस पावले उचलेल. दोन दिवसांपूर्वी आरसीबीने अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती.**

पहिल्यांदा आयपीएल जिंकल्यानंतर, आरसीबीने ४ जून रोजी बंगळुरूमध्ये विजयी परेड आयोजित केली. या परेड दरम्यान, एम चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५० हून अधिक जण जखमी झाले. जीव गमावलेले सर्व ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते.

चेंगराचेंगरीमुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांना आणि चाहत्यांना आम्ही आर्थिक मदतीपेक्षा जास्त मदत करू. आम्ही त्यांना जलद, पारदर्शक आणि मानवतावादी मदत देऊ. गर्दी व्यवस्थापनाचे चांगले प्रोटोकॉल विकसित करण्यासाठी स्टेडियम अधिकारी आणि क्रीडा संस्थांसोबत काम करेल.

आम्ही ग्रामीण भागाच्या विकासासाठी सामाजिक विकास कार्यक्रम राबवू. याची सुरुवात सिद्दी सम ुदायापासून होईल.संशोधन आणि प्रशिक्षणाद्वारे, दरवर्षी पंख्याच्या सुरक्षिततेचे ऑडिट फ्रेमवर्क तयार केले जाईल. आम्ही आमच्या ऑन-ग्राउंड भागीदारांना गर्दी व्यवस्थापन आणि आपत्कालीन प्रतिसाद यावर प्रशिक्षण देऊ.

बंगळुरूमध्ये एक जागा निर्माण करून, आम्ही अपघातात जीव गमावलेल्या चाहत्यांची नावे, कथा आणि संबंधित गोष्टी जतन करू. ही एक कायमची श्रद्धांजली असेल.हे स्टेडियम रोजगार निर्माण करेल, स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन देईल आणि नवीन पिढीला खेळात संधी देईल. कर्नाटक सरकारने आरसीबीला जबाबदार धरले.



● श्री. सुधीर मालप मु. शेडसई-रोहा यांच्या घरातील विराजमान गणेशमूर्ती. (छायाचित्र - सत्यप्रसाद आडाव)



● किहीम सरपंच पिंट्या गायकवाड, मु. चोंढी, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना डॉ. सुभाष म्हात्रे.(छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

# सोराना क्रिस्टीच्या ट्रॉफी चोरीला

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

न्यूयॉर्कमध्ये झालेल्या वर्षातील शेवटच्या ग्रँड स्लॅम यूएस ओपन दरम्यान ट्रॉफी चोरीचा एक प्रकार समोर आला आहे. रोमानियन टेनिसपटू सोराना क्रिस्टीने सोशल प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली आणि लिहिले की, महिला स्पर्धेत जिंकलेली तिची ट्रॉफी यूएस ओपन दरम्यान न्यू यॉर्कमधील एका हॉटेलच्या खोलीतून चोरीला गेली.

सोरानाने शनिवारी रात्री इंस्टाग्रामवर लिहिले की, द फिफ्टी सोनेस्टा हॉटेलच्या रूम नंबर ३१४ मधून माझी क्लीव्हलँड ट्रॉफी कोणी चोरली असेल. कृपया ती परत करा. त्याचे काही मूल्य नाही, पण त्याचे भावनिक मूल्य आहे. क्रिस्टीने या महिन्यात क्लीव्हलँडमध्ये तिच्या कारकिर्दीतील तिसरे एकेरी विजेतेपद जिंकले.

यूएस ओपनच्या दुसऱ्या फेरीत सोराना क्रिस्टीला ११ व्या क्रमांकाच्या कॅरोलिना मुचोवाकडून पराभव पत्करावा लागला. तिला चेक प्रजासत्ताकच्या मुचोवाकडून ७-६, ६-७, ६-४ असा पराभव पत्करावा लागला. सोराना क्रिस्टीने गेल्या आठवड्यात २४ ऑगस्ट रोजी क्लीव्हलँड लेडीज ओपनचे विजेतेपद जिंकले. तिच्या कारकिर्दीतील हे तिसरे एकेरी विजेतेपद आहे. अंतिम सामन्यात क्रिस्टीने अमेरिकेच्या ॲना लीचा सरळ सेटमध्ये पराभव केला. अंतिम सामना जिंकल्यानंतर क्रिस्टीने इन्स्टाग्रामवर ट्रॉफीसोबतचा एक फोटो पोस्ट केला.

# भारतात रंगणार पहिली आंतरराष्ट्रीय मास्टर्स महिला टेबल टेनिस स्पर्धा

**। गोवा । वृत्तसंस्था ।**

येत्या ५ ते ७ सप्टेंबरदरम्यान गोव्यात शी पॅडल इंटरनॅशनल मास्टर्स महिला टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली आह. टेबल टेनिसच्या दुनियेतील अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत दिसणार आहेत.

सर्वात प्रतिष्ठित खेळाडू ज्यात ६० वर्षांपेक्षा अधिक वयोगटातील जागतिक विजेता मंतु मुर्मुर, माजी राष्ट्रीय विजेती, मास्टर्स राष्ट्रीय विजेती आणि राष्ट्रकुल पदक विजेती रीता जैन आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक विजेती आणि ८ वेळा मास्टर्स नॅशनल चॅम्पियन मंगल सराफ यांच्यासह अनेक जणी सहभागी होऊन स्पर्धेची शोभा वाढवणार आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमात बुखारेस्ट, रोमानिया येथील एक आंतरराष्ट्रीय खेळाडू देखील सहभागी होईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)